बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ०७ | बुधवार,दि.२२ जानेवारी २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## भाजप जि.प.सदस्यामध्ये अध्यक्षपदाकरीता तर उपाध्यक्ष पदाकरीता राकाँमध्ये चुरस



**गोंदिया:–** गोंदिया जिल्हा परिषदेच्या पुढील अडीच वर्षाकरीता अध्यक्ष,उपाध्यक्ष निवडीचा कार्यक्रम जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी जाहीर केला असून येत्या शुक्रवार २४ जानेवारीला नव्या अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवडणूक जिल्हा परिषदेच्या सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे.

भारतीय जनता पक्षाकडे सदस्य संख्या मोठी असल्याने तसेच सोबत राष्ट्रवादी काँग्रेस (अप) असल्याने महायुतीचीच सरकार पुन्हा जिल्हा परिषदेवर येणार हे निश्चित झाले आहे.मात्र तीन दिवस–ावर अध्यक्ष उपाध्यक्षांची निवड आलेली असतानाही सदस्यांना वरिष्ठाकंडून विच–ारपूस होत नसल्याबद्दल स्वतःसदस्यच यावेळी अचबिंत आहेत.जिल्हा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाकरीता भाजप सदस्यामध्ये यावेळीही चांगलीच चुरस दिसून येत आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे यापुर्वी जिल्हा परिषद सदस्य राहिलेले गंगाधर परशुरामकर यांचा पराभव करुन डव्वा मतदारसंघात भाजपला विजय मिळवून देण–ारे डॉ.भुमेश्वर पटले हे सुध्दा रिंगणात उतरले आहेत.त्यांच्यासोबतच भाजपचे अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सक्रीय पदाधिकारी व विद्यमान जि.प.गटनेते लायकराम भेंडारकर,गोरेगाव तालुक्यात भाजपकरीता निष्ठेने काम करणारे म्हणून ओळख असलेले मुंडीपार गटाचे सदस्य डॉ.लक्ष्मण भगत,त्यांच्यासोबतच तिरोडा तालुक्यातील सेजगाव गटाचे सदस्य पवन पटले यांच्या नावाची चर्चा राजकीय वर्तुळात सध्याच्या घडीला दिसून येत आहे.

अर्जुनी मोरगाव मतदारसंघात भाजपचा आमदार नसल्याने भाजप या मतदारसंघावर आपली नजर रोखून ठेवू शकते असा राजकीय अंदाज असून या मतदारसंघातील डॉ.पटले,भेंडारकर व डॉ.भगत यांच्यापैकी कुणावर पक्षश्रेष्टी आपला हात ठेवतात याकडे लक्ष लागले आहे.

जिल्हा परिषदेत सध्या भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आहे. त्यातच विधानसभा निवडणूक काळात गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल यांच्या चाबी संघटनेचे सर्व सदस्य भाजपमय झाल्याने आत्ता भाजपची संख्या वाढली आहे.असे असले तरी पंचायत समिती सभापती निवडणूकीत महायुतीचा धर्म पाळला गेल्याने राष्ट्रवादी काँग्रेसला उपाध्यक्ष पद मिळणार हे नक्की झाले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून उपाध्यक्ष पदाकरीता तिरोडा तालुक्यातील सुकडी गटाचे जि.प.सदस्य बालु बावनथडे यांच्यासह एकोडी जि.प.गटाच्या सदस्या अश्विनी पटले व काटी जि.प.गटाच्या सदस्या नेहा तुरकर यांच्या नावाची चर्चा सुरु झाली आहे.या तिघापैकी कुणा एकाच्या गळ्यात उपाध्यक्ष पदाची माळ पडणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्तुळात चर्चा आहे.

५३ जागांपैकी **२६ जागा भाजपला मिळाल्या.काँग्रेस १३,चाबी ४, राष्ट्रवादी ८,अपक्ष दोन असे पक्षीय बलाबल आहे.**

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील गोंदियाचे पालकमंत्री

**गोंदिया :–** राज्यमंत्री मंडळाच्या विस्ताराला महिनाभराहून अधिकचा काळ लोटला. तरीही पालकमंत्री नियुक्तीचे मुहूर्त निघाले नव्हते. त्यामुळे गोंदिया जिल्हयाचे पालकत्व कुणाच्या खांद्यावर राहणार, अशी प्रतिक्षा होती. त्यातच काल पालकमंत्री जाहिर झाले. त्यात गोंदिया



जिल्ह्याला लातूरचे बाबासाहेब पाटील हे पालकमंत्री म्हणून लाभले आहेत. मंत्री बाबासाहेब पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आहेत. मागील दीड महिन्यापासून गोंदिया जिल्ह्याचे पालकत्व कुणाच्या खांद्यावर राहणार, याकडे लक्ष लागले होते. अलीकडे भाजपचे पदाधिकारी आमच्याकडे पालकत्व असावे तर राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आम्हालाच पालकत्वाची जबाबदारी मिळणार, असा विश्वास दर्शवित होते. त्यातच खा. प्रफुल पटेल यांच्या पसंतीचेच पालकमंत्री जिल्ह्याला लाभणार, असेही राजकीय वर्तुळात मानले जात होते. त्यानुरूप गोंदिया जिल्हयाला लातूर जिल्ह्याचे मुळ निवासी मंत्री बाबासाहेब पाटील हे पालकमंत्री म्हणून लाभले आहेत.

**झेंडा मंत्रीचा टॅग पुसणार काय?**

गोंदिया जिल्ह्याला एक–दोन पालकमंत्री वगळता सर्वच पालकमंत्री परजिल्ह्यातील मिळाले आहेत. त्यामुळे परजिल्ह्यातील मिळालेले पालकमंत्री या जिल्ह्यात पाहुण्यासारखे येतात आणि जातात? असेच चित्र राहिले. एवढेच नव्हेतर शासकीय कार्यक्रम व सोहळ्यापुरते हजेरी लावली जात होती. त्यामुळे परजिल्ह्यातील पालकमंत्र्यांना झेंडा मंत्री म्हणून संबोधले जायचे, हा टॅग आता पुसून निघणार काय? याकडे लक्ष लागले आहे.

## सुंगधित तंबाखू प्रकरणात वाहनमालकासह
# आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न
### अन्न औषध विभाग व पोलीस विभागाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह

**गोंदिया :** बालाघाटकडून गोंदियाकडे चारचाकी वाहनातून आणला जात असलेला सव्वा सहा लाखांचा सुगंधित तंबाखू वाहनासह जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई रामनगर पोलिसांच्या डी. बी. पथकाने बुधवारी (ता. १५) रात्री साडेआठच्या सुमारास येथील बालाघाट टी–पाइंटवर केली.यात ६ लाख २७ हजार ४२२ रुपये किमतीचा सुंगधित तंबाखू व ७ लाख रुपये किमतीचे अशोक लेलंड कंपनीचे वाहन असा १३ लाख २७ हजार ४२२ रुपयाचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.परंतु अद्यापही वाहनमालकावर काय कारवाई करण्यात आली हे स्पष्ट झा–लेले नाही. आजपर्यंतच्या अनेक कारवाईत वाहनमालकाला का सोडण्यात येते हा मुद्दा चौकशीचा झालेला आहे.



### कारवाई करणारे पोलिस पथक

**ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अपर पो–लीस अधीक्षक झा, उपविभागीय पोलीसअधिकारी रोहिणी बानकर, रामनगरचे पोलीस निरीक्षक बोरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमोल वाघमोडे, सहायक फौजदार भुरे,पोलीस हवालदार चव्हाण,पोलीस हवालदार भगत,पोलीस शिपाई नागपुरे, कांबळे, फेंडर यांनी केली.**

मात्र सदर वाहनातून जप्त दाखवण्यात आलेला सुंगधित तंबाखू हा कमी किमतीचा असल्याची चर्चा असून बाला–घाट ये़थून या वाहनात अंदाजे २५ पिशव्या सुगंधित तंबाखूच्या घेऊन अजय परसराम चांदवानी यांच्या मालकीचे वाहन क्र.एमएच ३५/ ए. जे. २६१३ हे चालक बालाजी लक्ष्मीनारायण नायडू (रा.छोटा गोंदिया) निघाल्याची माहिती समोर आली आहे.

सदर वाहनाची तक्रार ही ११२ क्रमांकावर करुन देण्यात आली, त्यानंतर ही कारवाई झाल्याचेही बोलले जाते. जेव्हा सदर वाहनासह चालकाला ताब्यात घेत रामनगर पोलीस ठाण्यात नेण्यात आले, तेव्हा वाहनात असलेल्या साहित्याचे छायाचित्रीकरण करीत असलेल्यांना आम्ही सर्व माहिती देऊ असे सांगत चित्रिकरण करण्यास थांबविण्यात आले. त्यानंतर मात्र सदर वाहनातील २५ पिशव्यापैकी १० पिशव्याच वाहनात असल्याचे सांगण्यात आल्याने या प्रकरणात पोलीस विभागासह अन्न औषध विभागाच्या कारवाईवर शंका उपस्थित झालेली आहे.बालाघाटवरुन आलेल्या या पिशव्या या किमान ३–५ जणांच्या असल्याचीही चर्चा आहे.

रामनगर पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अमोल वाघमोडे हे बुधवारी रात्रीला पथकासह पेट्रोलिंग करीत होते. यावेळी त्यांना सुगंधित तंबाखू घेऊन चारचाकी वाहन बालाघाटकडून गोंदियाकडे येत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार, पोलीस पथकाने येथील बाला–घाट टी–पाइंटवर पाळत ठेवली. बालाघाटकडून येणाऱ्या वाहनांची तपासणी केली. दरम्यान, बालाघाटकडून आलेल्या एमएच ३५/ ए. जे. २६१३ क्रमांकाच्या चारचाकी वाहनाची तपासणी केली असता, पथकाला या वाहनात सुगंधित तंबाखूच्या जवळपास दहा पिशव्या आढळून आल्या.

वाहन चालक बालाजी लक्ष्मीरायण नायडू (रा. छोटा गोंदिया) याची अधिक चौकशी केल्यावर त्यात सव्वा सहा लाखांचा हा तंबाखू गोंदियाला नेला जात असल्याचे समजले. पोलिसांनी वाहनचालकाला ताब्यात घेतले असून, सुगंधित तंबाखूसह वाहन जप्त करीत पुढील तपास सुरू असल्याची माहिती दिली.

उल्लेखनीय म्हणजे, अजय परसराम चांदवानी यांच्या मालकीचे हे वाहन असून, चांदवानी हे सुगंधित तंबाखूचा व्यवसाय आपल्या वाहनाच्या माध्यमातून करीत असल्याची चर्चा आहे. सोबतच गोंदियातील एक सुगंधित तंबाखु व्यवसायी जे बालाघाटमधूनच सुगंधित तंबाखू आणत तिरोडासह इतर ठिकाणी आपल्या काळ्या रंगाच्या किया या चारचाकी वाहनाने पोचते करीत असल्याचीही चर्चा आहे. सदर व्यवसायिकाच्या बोलण्यानुसार पोलीस व अन्न औषध विभागाचे अधिकाऱ्यांना मासिक रक्कम देत असल्याने कुणी कुठलाही मोठा अधिकारी कारवाई करणार नाही असे बोलून बालाघाटवरुन ज्या वाहनातून सुंगधित तंबाखू आणले जाते, त्या वाहनमालकाला विश्वास देत असल्याने अन्न औषध विभागाने आपली प्रतिमा मलीन केल्याचे या प्रकरणातील कारवाईवरुनही दिसून आली.


## फोल्डिंग हेल्मेट दुचाकीसाठी उपयुक्त–आता दुचाकीमध्ये ठेवता येणार दोघांचे हेल्मेट
### भौतिकशास्त्र विभागातील डॉ. संजय ढोबळे व आदिती देशमुख यांचे संशोधन

**नागपूर :–** दुचाकी स्वारांसाठी उपयुक्त ठरेल, असे फफ्रोल्डिंग हेल्मेट राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील संशोधकांनी तयार केले आहे. दोघांचीही हेल्मेट दुचाकीमध्ये ठेवता येणारे नाविन्यपूर्ण संशोधन भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय ढोबळे व एमएससीची विद्यार्थिनी आदिती देशमुख यांनी केले आहे.

लोकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत वाहतूक नियमात बदल केले जातात. त्यातच दुचाकी वाहनासाठी दोन्ही व्यक्तींना हेल्मेट घालावे, असे म्हटले आहे. हेल्मेट घालून दुचाकी चालवणे फार गरजेचे आहे. हेल्मेट न घातल्यामुळे कित्येक अपघात आपल्याला पाहायला मिळतात. त्यामुळे हेल्मेटची उपयुक्तता सगळ्यांना माहिती आहे. त्याकरिता दुचाकीवर एक हेल्मेट ठेवायची व्यवस्था देखील केलेली असते. मात्र, दोघांसाठी देखील हेल्मेट अनिवार्य केले तर जेव्हा वाहन उभे राहील त्यावेळी हेल्मेट कोठे ठेवायचे हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. जेव्हा प्रश्न निर्माण होतात. तेव्हा त्यावर उपाय शोधणे हाच संशोधकांचा विषय होतो.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे यांनी एमएससी भौतिकशास्त्र विषयाची विद्यार्थिनी आदिती देवेंद्र देशमुख यांच्या सोबत संशोधन करून वाहन उभे असल्यावर दोन्ही हेल्मेट कसे ठेवता येईल. याकरिता फोल्डिंग हेल्मेटची कल्पना प्रत्यक्षात आणली आहे. त्यावर कार्य करीत दोघांनीही फोल्डिंग हेल्मेटची डिझाईन बनवून त्यातील सर्व कार्यपद्धती व मजबुती नियमित हेल्मेटप्रमाणे राहील याची काळजी घेत नवीन तंत्रज्ञानाच्या विज्ञानातून तयार केले व या फोल्डेड हेल्मेट करिता आंतरराष्ट्रीय पेटंट देखील मिळविले आहे. नुकतेच डॉ. संजय ढोबळे व आदिती देशमुख या दोघांना आंतरराष्ट्रीय पेटंट मिळाले आहे. त्यांचे हेल्मेट तयार करण्याचे कार्य सुरू झाले आहे. या हेल्मेटची मजबूती नियमित हेल्मेटप्रमाणे राहून त्याद्वारे अपघाताच्या वेळी डोक्याला इजा होणार नाही, या प्रकारे साहित्य वापरण्यात येणार आहे.

फोल्डिंग हेल्मेट उघडल्यावर व्यवस्थित उघडून ते डोक्यात घालता येईल, याची देखील काळजी घेण्यात आली आ–हेत. आजच्या परिस्थितीत ज्या दुचाकी वाहन आहे त्यामध्ये एक हेल्मेट ठेवण्याची व्यवस्था आहे व आता नवीन संशोधनाद्वारे तयार केलेले फोल्डिंग हेल्मेट ठेवण्याची व्यवस्था होईल. समाजाच्या हितासाठी केलेले संशोधन हे विद्यापीठासाठी गौरवाची बाब झाली आहे. समाजपयोगी संशोधन



Part 1 to 10 are complete fabricated by high strength & lighter weight material

केल्याने विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र–कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर यांच्यासह विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी डॉ. संजय ढोबळे व आदिती देशमुख यांचे अभिनंदन केले आहे.

# ६ पंसवर भाजपचे तर सालेकसा येथे काँग्रेस व अर्जुनी मोरला राकाँच्या सभापती



**गोंदिया :** जिल्ह्यातील आठही पंचायत समिती सभापती, उपसभापतिपदाची निवडणूक सोमवारी (ता. २०) घेण्यात आली. आठपैकी सहा पंचायत समित्यांवर भाजपचे सभापती, अर्जुनी मोरगाव पंचायत समितीवर राष्ट्रवादी काँग्रेस, तर सालेकसा पंचायत समितीवर काँग्रेसचे सभापती ठरले.

पंचायत समिती सभापतिपदासाठी १० जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात आरक्षण सोडत काढण्यात आली होती. त्यानुसार, गोंदिया पंचायत समिती सभापतिपद सर्वसाधारण, आमगाव सर्वसाधारण (महिला), सालेकसा सर्वसाधारण (महिला), गोरेगाव सर्वसाधारण (महिला), तिरोडा सर्वसाधारण, सडक अर्जुनी अनुसूचित जमाती, देवरी सर्वसाधारण व अर्जुनी मोरगाव अनुसूचित जाती महिलेसाठी राखीव होते. सोमवारी झालेल्या निवडीत गोंदिया पंचायत समितीचे सभापती म्हणून मुनेश रहांगडाले यांची दुसऱ्यांदा निवड झाली आहे. अर्जुनी मोरगाव पंचायत समिती सभापती व उपसभापतिपदाच्या निवडीसाठी निवडणूक घेण्यात आली. अन्य सातही ठिकाणी बिनविरोध निवड झाली.

**गोंदिया पंचायत सभापतिपदी रहांगडाले, उपसभापतिपदी जमरे**

**गोंदिया :** येथील पंचायत समिती सभापतिपदी विद्यमान सभापती मुनेश रहांगडाले; तर उपसभापतिपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवलाल जमरे यांची बिनविरोध निवड झाली. अडीच वर्षांपूर्वी पंचायत समितीत आमदार विनोद अग्रवाल यांच्या चावी संघटनेचे १० सदस्य निवडून आले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे ५, भाजपचे १०, अपक्ष २, तर बसपचा १ अशी सदस्य संख्या आहे. पंचायत समितीवर भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसची एकहाती सत्ता असल्याने ही निवडणूक बिनविरोध पार पडली.

**तिरोडा पंचायत समितीसभापतिपदी चव्हाण, उपसभापतिपदी सुनंदा पटले**

**तिरोडा :** येथील पंचायत समितीच्या सभापतिपदी भाजपचे तेजराम चव्हाण; तर उपसभापतिपदी सुनंदा पटले यांची बिनविरोध निवड झाली.

पंचायत समितीमध्ये भाजपचे वर्चस्व असून एकूण १४ सदस्यांपैकी ९ सदस्य भाजपचे आहेत. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) ३ सदस्य, काँग्रेसचा १ आणि प्रहार जनशक्ती पक्षाचा १ सदस्य आहे. सभापतिपदासाठी भाजपकडून तेजराम चव्हाण यांची



निवड करण्यात आली. चव्हाण दुसऱ्यांदा पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून आले आहेत. महिला आरक्षणाचा विचार करून उपसभापतिपदी सुनंदा पटले यांची निवड करण्यात आली.

**सभापतिपदी चित्रकला चौधरी, उपसभापतिपदी रामेश्वर महारवाडे**

**गोरेगाव :** येथील पंचायत समितीवर भाजपचे वर्चस्व असून, चित्रकला चौधरी यांची सभापतिपदी, तर रामेश्वर महारवाडे



यांची उपसभापतिपदी बिनविरोध निवड करण्यात आली.चित्रकला चौधरी यांची २०१३ मध्ये पंचायत समिती सभापतिपदी निवड करण्यात आली होती. त्यामुळे त्यांना विकासकामे, नागरिकांचे प्रश्न सोडविण्याचा दांडगा अनुभव आहे. दरम्यान, भारतीय जनता पक्षातील वरिष्ठांनी पंचायत समिती सदस्यांचे विचार जाणून चित्रकला चौधरी यांच्या नावाची घोषणा केली. उपसभापतिपदी रामेश्वर महारवाडे यांचे नाव समोर करत त्यांचीही बिनविरोध करण्यात आली.

नामांकन अर्ज दाखल करतेवेळी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मणराव भगत, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ओम कटरे, मावळते सभापती मनोज बोपचे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गिरधारी बघेले, गटविकास अधिकारी हेमराज गौतम, माजी सभापती विश्वजित डोंगरे, यशवंत कावळे, बंटी गौतम, किशोर मेश्राम, दीपक बोपचे उपस्थित होते.

**सालेकसा पंचायत समिती सभापतिपदी वीणा कटरे; उपसभापती बल्हारे**

**सालेकसा :** येथील पंचायत समितीवर काँग्रेसचे वर्चस्व असून, सभापतिपदी काँग्रेसच्या वीणा कटरे, तर उपसभापतिपदी



जितेंद्र बल्हारे यांची निवड करण्यात आली. सभापती, उपसभापतिपदासाठी भाजपकडूनही उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. भाजपच्या अर्चना मडावी यांनी सभापतिपदासाठी, तर उपसभापतिपदासाठी गुमानसिंग उपराडे यांनी उमेद–वारी अर्ज दाखल केला होता. काँग्रेसकडून वीणा कटरे यांनी सभापतिपदासाठी व जितेंद्र बल्हारे यांनी उपसभापतिपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. यात वीणा कटरे यांना आठपैकी सहा मते, उपसभापतिपदासाठी जितेंद्र बल्हारे यांना आठपैकी सहा मते मिळाली. दरम्यान, वीणा कटरे यांची सभापतिपदी, तर उपसभापतिपदी जितेंद्र बल्हारे यांची निवड करण्यात आली.

नामांकन अर्ज दाखल करतेवेळी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम कटरे, जिल्हा परिषद सदस्य विमल कटरे, जिल्हा परिषद सदस्य वंदना काळे, जिल्हा परिषद सदस्य छाया नागपुरे, काँग्रेस तालुकाध्यक्ष राजू दोनोडे, माजी जिल्हा परिषद सदस्य लता दोनोडे, युवराज कटरे, विजय फफ्रुंडे यांच्यासह काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

**पंचायत समिती सभापतिपदी अनिल बिसेन; उपसभापती शालिकराम गुरनुले**

**देवरी :** येथील पंचायत समिती सभापतिपदी गोटाबोडी पंचायत समिती क्षेत्राचे सदस्य अनिल बिसेन यांची; तर उपसभापतिपदी पालांदूर/जमी. पंचायत समिती क्षेत्राचे सदस्य शालिकराम गुरनुले यांची निवड झाली.

भारतीय जनता पक्षाने त्यांच्या नावाची घोषणा केल्यानंतर त्यांनी निवडणूक अधिकारी तथा तह–



सीलदार यांच्या समक्ष आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. सभापती व उपसभापतिपदाच्या स्पर्धेत केवळ एक अर्ज दाखल झाल्याने निवडणूक अधिकाऱ्यांनी सर्व प्रक्रियेनंतर सभापतिपदी अनिल बिसेन, तर उपसभापतिपदी शालिकराम गुरनुले यांची निवड झाल्याचे घोषित केले.

**भाजपच्या योगिता पुंड सभापती, सुनंदा उके उपसभापती बिनविरोध**

**आमगाव :** येथील पंचायत समितीच्या सभापतिपदी भाजपच्या योगिता पुंड, तर उपसभापतिपदी सुनंदा उके यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी राजेंद्र गौतम, नोहरलाल चौधरी,



तिलकचंद मडावी, सरिता हर–िणखेडे, गीता शेंडे, शिला ब्राह्मणकर, तारेंद रामटेके व नंदकिशोर कोरे प्रामुख्याने उपस्थित होते. नवनिर्वाचित सभापती व उपसभापती यांचा भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सत्कार केला.

निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी तहसीलदार मोनिका कांबळे, नायब तहसीलदार सतीश वेलादी, एम. जी. पालीवाल, एस. बी. बागडे यांनी सहभाग घेतला.

**सडक अर्जुनी पंचायत समिती सभापतिपदी चेतन वळगाये**

**सडक अर्जुनी:** येथील पंचायत



समितीच्या सभापतिपदाची सोडत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव झाल्याने साहजिकच भाजपचे चेतन वळगाये, सपना नाईक यापैकी एक सभापतिपदी विराजमान होतील, अशी शक्यता वर्तवली जात होती. त्यातच चेतन वळगाये यांचे पक्षातील कार्य पाहता ते सरस ठरले.

भाजपकडे ७ सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस २, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस १ सदस्य अशी सदस्य संख्या आहे. दरम्यान, अनुसूचित जमाती प्रवर्गातून भाजपचे चेतन वळगाये यांची सभापतिपदी, तर उपसभापतिपदी पंचायत समिती सदस्य निशा काशीवार यांची निवड करण्यात आली.

### सभापतिपदी आम्रपाली डोंगरवार; काँग्रेसच्या पाठिंब्याने भाजप बंडखोर संदीप कापगते उपसभापती

**अर्जुनी मोरगाव : येथील पंचायत समितीचे सभापतिपद हे अनुसूचित जाती महिला या प्रवर्गासाठी राखीव असल्याने एकमेव उमेदवार असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आम्रपाली डोंगरवार यांची**



**बिनविरोध निवड करण्यात आली. उपसभापतिपदासाठी भाजपकडून नूतनलाल सोनवने यांना उमेदवारी अर्ज सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. दरम्यान भाजपने आपणास पुन्हा डावलल्याचे लक्षात येताच संदीप कापगते यांनी भाजपच्या चार सदस्यांना सोबत घेत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या वेळेपर्यंत कुणीही अर्ज मागे न घेतल्याने उपसभापतिपदाकरिता भाजपच्याच दोन उमेदवारात निवडणूक झाली. यात भाजपचे अधिकृत उमेदवार सोनवने यांना ६ तर भाजपचे बंडखोर कापगते यांना ८ मते मिळाली. यात बंडखोर उमेदवार कापगते हे निवडून आले. त्यामुळे उपसभापतिपदाची माळ संदीप कापगते यांच्या गळ्यात पडली. विशेष म्हणजे, या निवडणुकीत कुंदाताई लोगडे, शालिनीताई डोंगरवार, संदीप कापगते, वंचितच्या सविता कोडापे, व काँग्रेसच्या चार सदस्यांनी कापगते यांना मतदान केले. तर राष्ट्रवादीच्या दोन सदस्यांनी भाजपचे सोनवने यांना मतदान केले.**

## संपादकीय

# "लालपरी" खरंच स्मार्ट होणार?

धावपळीच्या आणि अत्यंत गतिमान काळात असे दुर्मीळ मध्यमवर्गीय अथवा निम्नमध्यम वर्गीय कुटुंब असावे की ज्यांच्याकडे दुचाकी अथवा चारचाकी गाडी घरासमोर नाही. काही वर्षांपूर्वी चारचाकी गाडी ही चैनीची वस्तू म्हणून मध्यमवर्गीय त्याकडे पाहायचे; परंतु काळाच्या ओघात आणि गतीच्या स्पर्धेत परंपरागत सर्व समज मागे पडले आणि कुटुंबामध्ये चारचाकी असणे हे गरजेचे लक्षण बनले आणि ज्या कुटुंबाकडे चारचाकी घेण्याची आर्थिक क्षमता नाही त्यांच्याकडे किमान दुचाकी तरी असतेच असते. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय समाजाच्या जीवनशैलीमध्ये जो काही एक आमुलाग्र बदल झाला त्यामध्ये चारचाकी आणि दुचाकी वाहनांची निर्माण झालेली अथवा करण्यात आलेली गरज हा एक मोठा बदल म्हणावा लागेल. मात्र असे असले तरी देखील आजही गावोगावी खेडोपाडी अगदी दुरगामी वाड्या, वस्त्यांवर पाड्यांवर केवळ पाच ते दहा रुपयाच्या नाममात्र शुल्कामध्ये हमखास नेऊन सोडणारी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची बस सेवा ही तळागाळातील गोरगरीब जनतेसाठी आजही त्याच्या दैनंदिन गरजा भागवण्यामध्ये आणि दैनंदिन व्यवहारामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

ज्याप्रमाणे मुंबईची उपनगरीय रेल्वे सेवा ही रक्तवाहिनी म्हणून ओळखली जाते त्याचप्रमाणे एसटी बस ही ग्रामीण महाराष्ट्राची आणि त्यातही अत्यंत गोरगरीब जनतेची खऱ्या अर्थाने रक्तवाहिनी म्हणूनच काम करत आहे. अर्थात कोणत्याही देशाची अथवा राज्याची सार्वजनिक वाहतूक यंत्रणा ही आर्थिकदृष्ट्या फायद्यामध्ये कधीच नसते त्यामुळे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ हे गेली वर्षांनुवर्षे तोट्याची कोटींच्या कोटी उड्डाणे घेत आहे. सरकार येतात आणि जातातही. मात्र गोरगरिबांना अत्यंत अल्पशा भाड्यामध्ये त्यांच्या घराजवळ हक्काने नेऊन सोडणारी एसटी ही मात्र गेली वर्षांनुवर्ष दारिद्र्यात आणि तोट्याच्या दुष्टचक्रात अडकून पडलेली आहे. त्यात प्रामुख्याने सत्तेवर असलेल्या राजकीय पक्षांची एसटी महामंडळाकडे पाहण्याची दृष्टी, खासगी वाहनांचा वाढलेला अतिरेकी आणि बेसुमार वापर, अवैध प्रवासी वाहतुकीला मिळणारे पाठबळ आणि त्याचबरोबर उपद्रवी घटकांचा एसटीचे लचके तोडण्याचा सातत्याने सुरू असलेला प्रयत्न हे जे लक्षात घेतले तर केवळ आणि केवळ प्रामाणिक आणि कष्टकरी राज्य परिवहन मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या पाठबळावरच महाराष्ट्राची ही जीवन वाहिनी एवढ्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील स्वतःचे अस्तित्व राखून आहे असेच म्हणावे लागेल.

मग पगाराची कोणतीही हमी ना भविष्य निर्वाह निधीची कोणतीही शाश्वती मात्र असे असले तरी देखील ज्या निष्ठेने आणि ज्या तळमळीने एसटी महामंडळाचे कर्मचारी केवळ सर्वसामान्य गोरगरीब प्रवाशांच्या करिता हा उपक्रम जिवंत ठेवत आहेत हे खरोखरच अत्यंत धाडसाचे आणि कौतुकास्पद म्हणावे लागेल. मध्यंतरी माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने महाराष्ट्रातील महिलांसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या बस सेवेत ५० टक्के बस भाड्यामध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतला. आणि त्याचा एक मोठा परिणाम जो परिवहन महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर दिसून आला. तो म्हणजे महामंडळाच्या उत्पन्नात या निर्णयामुळे घसघशीत वाढ झाली. यामुळे कर्मचाऱ्यांना किमान महिनाभराचे वेतन तरी दोन-चार दिवस मागेपुढे का होईना परंतु मिळू लागले.

अन्यथा दोन-दोन, चार-चार महिने एसटी कर्मचाऱ्यांना वेतन मिळतानाही मारामारी होती आणि त्यासाठी देखील अखेरीस महामंडळाला राज्य सरकार पुढे हात पसरावे लागत होते. अर्थात आता राज्यामध्ये भाजप शिवसेना अजित पवार यांचे राष्ट्रवादी अशा भरभक्कम महायुतीचे बाहुबली बहुमताचे सक्षम महायुती सरकार सत्तेवर आहे आणि परिवहन मंत्रालयाची जबाबदारी तरुण आणि कार्यक्षमतेची चुणूक दाखवणारे नेते म्हणून समजले जाणाऱ्या प्रताप सरनाईक यांच्यासारख्या उमद्या तडफदार मंत्र्याकडे परिवहन मंत्रालयाची जबाबदारी आहे. परिवहन खात्याचा कारभार हाती घेतल्यानंतर तातडीने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ठाणे मीरा-भाईंदर या त्यांच्या स्वतःच्या कार्यक्षेत्रापासूनच कामाचा श्री गणेशा सुरू केला. ठाण्यातील एसटी बस डेपोंना तातडीने भेटी देत त्यांनी तेथील यंत्रणांना बेशिस्तपणा न खपवून घेण्याबाबत चांगलीच समज दिली. आणि त्याचबरोबर आर्थिक तोट्याच्या दुष्टचक्रात अडकून पडलेल्या एसटी महामंडळाला पुन्हा उभारी आणण्यासाठी तसेच एसटी महामंडळाकरिता नवनवीन आर्थिक स्त्रोत कसे विकसित करता येतील याकरता प्रताप सरनाईक यांनी जोमाने काम सुरू केले.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे सर्वात मोठी जमेची बाजू जर कोणती असेल तर ते म्हणजे महामंडळाचे प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अथवा मोठ्या शहरांमध्ये देखील मोक्याच्या ठिकाणी असलेले स्वतःच्या जागेतील एसटीचे डेपो आणि तेथील जागा आहे. या आधीच्या परिवहन मंत्र्यांनी देखील एसटीच्या डेपोंचा बीओटी तत्त्वावर खासगी करण्याच्या माध्यमातून विकास करण्याचा प्रयत्न केला तथापि त्याला होणारा विरोध आणि विरोधातून होणारी शेवटी कोर्टबाजी यात एसटी डेपोंचा विकास हा शेवटी अडकून पडला. परिवहन मंत्री झाल्यानंतर प्रताप सरनाईक यांनी सर्वप्रथम मीरा-भाईंदर येथील एसटी महामंडळाची जागा मीरा-भाईंदर महापालिकेला विकसित करण्यासाठी दिली आणि त्यामुळे आता मीरा-भाईंदरमधील एसटीच्या या जागेचा चेहरा मोहरा पूर्णतः बदलणार आहे. त्याचबरोबर सरनाईक यांनी आणखी एक नवीन निर्णय घेतला आहे तो म्हणजे एसटी डेपोमध्ये एसटीचे स्वतःचे डिझेलचे पंप आहेत हे ऑइल कंपन्यांना चालवण्यास देऊन त्याद्वारे एसटी महामंडळाला वाढीव उत्पन्नाचा एक नवीन स्त्रोत निर्माण करता येऊ शकेल असे त्यांचे प्रयत्न आहेत. त्याचबरोबर भाडेतत्त्वावरील बसेस बंद करण्याचा निर्णय घेऊन आगामी काळात ५०० नवीन बस गाड्या घेण्याचा मनोदयही त्यांनी व्यक्त केला आहे. एसटी महामंडळ तोट्यातून जर फायद्यात येणार असेल, तर निश्चितच अशा धाडसी निर्णयांचे स्वागतच केले पाहिजे मात्र त्याचबरोबर हे धाडसी निर्णय अंगावर येणार नाहीत याची देखील काळजी परिवहन मंत्र्यांनी तसेच राज्य सरकारने घेण्याची गरज आहे.

उत्पन्नाचे वाढीव स्त्रोत शोधताना एक गोष्ट लक्षात घेण्याची गरज आहे ती म्हणजे महाराष्ट्रात जी मोठ्या प्रमाणावर खासगी अवैध प्रवासी वाहतूक फोफावलेली आहे तिला जर प्रतिबंध करायचा असेल, तर केवळ कायदे अथवा नियमांचा धाकदपटशा दाखवून अवैध प्रवासी वाहतूक बंद होणार नाही, तर त्या पलीकडे जाऊन यामध्ये अधिक काम करण्याची गरज आहे.

महाराष्ट्र आणि महाराष्ट्राला जोडून असलेले काही शेजारी राज्य की जी पर्यटनदृष्ट्या आणि व्यावसायिकदृष्ट्या महाराष्ट्राशी एकरूप आणि समरूप झाली आहेत अशा राज्यांमध्ये जर का महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमधून किमान पर्यटनाच्या हंगामामध्ये जरी खासगी आरामदायी बस सेवेसारखी दर्जेदार व सेवा एसटी महामंडळाकडून या मार्गांवर जर का प्रवाशांना उपलब्ध होऊ लागली, तर निश्चितच खासगी बस सेवेकडील प्रवाशांचा ओघ हा एसटी महामंडळाकडे वळल्याशिवाय राहणार नाही. मात्र त्यासाठी प्रचंड इच्छाशक्ती, प्रयत्नांची शिकस्त, एसटीच्या कामात सुसूत्रता, शिस्तबद्धता आणि सचोटीची नितांत गरज आहे. तरच महाराष्ट्राची लाडकी लालपरी ही आगामी काही वर्षांत अधिक स्मार्ट दिसू शकेल.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता, शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# सत्यशोधक महिला समेलन महानायिकेच्या गावात-स्मिता पानसरे



**अहिल्यानगर :-** अहिल्याराणींना एव वेगळ्या पद्धतीने आपल्या समोर नेहमी मांडण्यात येते. पण त्यांची कर्तृत्ववान बाजू जगासमोर येत नाही. राजकारण, समाजकारण आर्थिक व्यवस्था कशी असावी? स्त्री पुरुष समानतेचा अर्थ काय ? स्वतः सती न जाता समाजासमोर एक कुशल योद्धा, समाजकारणी, राजकारणी म्हणून अहिल्याराणीची प्रतिमा आमच्यासमोर असावी, यावर महिलांनी लक्ष देण्याची गरज असल्याचे विचार जेष्ठ विचारवंत स्मिता पानसरे यांनी व्यक्त केले.

त्या अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी येथे ५ जाने.ला आयोजित राजमाता लोकमान्य अहिल्याराणी होळकर यांच्या माहेरी (जन्मस्थळी) त्रिशताब्दी जन्मोत्सव निमित्त सत्यशोधक महिला महासंघ, महाराष्ट्र प्रदेश आयोजित सत्यशोधक महिला संमेलनात बोलत होत्या.

साखळदंडाने बांधलेल्या बंदिस्त महिलेची साखळी तोडून स्वीने मुक्त श्रास घ्यावा असा संदेश देणारे, संमेलनाच्या उद्घाटक प्रा.सविता हजारे यांच्या हस्ते समेलनाचे उदघाटन करण्यात आले.यावेळी महामानवांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून 'सत्य सर्वांचे आदी घर, सर्व धर्माचे माहेर' हे वंदनगीत मआईची वाडी तीनखेडा येथील विद्यार्थिनींनी सादर केले.

अधिवेशनाच्या आयोजनासंदर्भात सत्याशोधक महिला संघाच्या अध्यक्षा वंदना वनकर यांनी स्वी आजही मुक्त नाही हे सांगण्यासाठीच कार्यक्रमाचे उद्घाटन साखळ दंडाने नंदिस्त असलेल्या स्त्रीला मुक्त करून केल्याची माहिती प्रास्ताविकातून दिली

स्वागताध्यक्ष आशा राम शिंदे यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणारे लेखक, विचारवंत, सत्यशोधक कार्यकर्ते, विद्यार्थी, ग्रामवासी या सर्वांचे स्वागत केले. नागपूरमधून बंदना वनकर यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सर्वांना संघटित करून आमच्या चौंडी गावात एवढे देखणे संमेलन घेतले याचा मला सार्थ अभिमान अहे. असे संमेलन सतत व्हावे अशी मी आशा बाळगते असे भरभरून कौतुक केले. कार्यक्रमाचे मुख्य वक्ता प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. अशोक चोपडे, ॲड वैशाली डोळस, यांनी सत्रात बोलताना मार्गदर्शनकेले सत्यशोधक महिला संमेलन २०२३ च्या स्मरणकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. संमेलनाध्यक्ष रंजना कांबळे यांनी सांगितले की दिवसेंदिवस अशा प्रकारचे संमेलन होण्याची काळाची गरज आहे. आपल्या महामानवांच्या विचारांची सुरुवात कुठून झाली याची साधीकल्पनाही समाजाच्या महिलांना नाही याची खंत व्यक्त केली.

अहिल्याराणी खेळकर यांचे वंशज 'भाम आई शिंदे' यांचा या ठिकाणी सत्यशोधक महिला महासंघाच्या कार्याध्यक्ष प्रा. वृंदा शेंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सत्यशोधक महिला महासंघ, नहाराष्ट्र राज्याच्या वतीने मसत्यशोधक पुरस्कारफ आपापल्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील काही प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांना प्रदान करण्यात आला. सामाजिक क्षेत्र विद्या करपे, राहुरी, अहिल्यानगर साहित्यिक क्षेत्रात निसर्गवासी गणपतराव उगले, पैठण यांचा सत्कार त्यांचे सुपुत्र ऋषिकेश उगले तर अँद्योगिक क्षेत्रात पूजा मानमोडेनागपूर या व्यक्तिमत्त्वांनी हा सत्कार स्वीकारला. कार्यक्रमा दरम्यान लोकमान्य राजमाता अहिल्यारापी होळकर यांच्या जीवनावर देवयानी फुले सातारा हिने एक पात्री नाट्य अभिनय सादर केले. तर सावित्रीआई यांच्या जीवनावर सुत्रिया घायतडक, जामखेड यानी एकपात्री अकृष्पणे सादर केले.

प्रा.डॉ. प्रभाकर गायकवाड यांनी ठराव मांडले. २०२६ मध्ये सत्यशोधक महिला संमेलन, वणंद ता दापोली, जिल्हा - रत्नागिरी 'रमाई यांच्य जन्मगावी' घेण्यात येणार आहे. हा ठाव एकमताने पास झाला. सत्राचे अध्यक्ष प्रा. कवित मेहेत्रे यांनी संपूर्ण बहुजन समाजाने आपली एक दिशा ठरवली पाहिजे ही काळाची गरज आहे. असा आपल्या मार्गदर्शनातून संदेश दिला.

संमेलनात प्रा. वृंदा शेंडे, डॉ. सुनिता शिंदे, मदनदाव नागपुरे, मया गोरे, प्रा.बनिता काळे, सेवादल संस्थेचे अध्यक्ष संजय शेंडे, मीना नत्रले, सुनिता दरवाडे, संजयदादा सोनटक्के, अनुज हुलके, बाबा बिडकर यांच्या उपस्थितीत संमेलन पार पडले.

संमेलनाला मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. त्यांनी शिवाजी महाराजाचे पोवाडे, सऊ गीत सादर केलीत. त्याचे श्रेय शिक्षका प्रा. प्रतिभा रेवतकर, प्र.प्रियंका शिंदे यांना जाते. प्रमाणपत्र देऊन विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे कौतुक करण्यात आले. संमेलनाचे संचालन प्रा. डॉ. ठीणा राऊत, आभार स्वाती पाटील यांनी केले.

हे संमेलन यशस्वी करण्याकरिता प्रवीणा बालपांडे, संध्या राजूरकर, माई हटवार, सोमेश्वरदादा अहेर, कुणाल नासरे, सुनता कोथिंबीर श्रावणी सरदार, स्यिा कच्छवा, प्रिया वानखेडे, हर्षिता पोटे, अश्विनी रणसिंगे, शुभांगी शिंदे, वर्षा पाटील, गीता जागी, मंजुषा धावडे, सोहम नासरे यांच्यासोबतच इतरांनीही अनेक परिश्रम घेतले. संमेलनाच्या संपोजिका वंदन वनकर, अध्यक्ष सत्यशोधक महिला महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या अथक परिश्रमाने मोठ्या थाटात संमेलन झाले.

# प्राथमिक शिक्षक समिती अर्जुनी मोरच्यावतीने नवोदय सराव परीक्षा उत्साहात



**गोंदियाः-** "सामूहिक प्रयत्नातून शैक्षणिक समृद्धतेकडे" या तत्वानुसार महा. राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा अर्जुनी/मोर च्यावतीने दरवर्षीप्रमाणे जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांची "नवोदय प्रवेश परीक्षा २०२५" ची पूर्वतयारी होण्याच्या दृष्टीने शिक्षणप्रेमी शिक्षक व पालकांच्या मदतीने नवोदय सराव परिक्षेचे आयोजन करण्यात आले होते.ही सराव परीक्षा २९ डिसेंबर २०२४ पासून १२ जानेवारी २०२५ या कालावधीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अर्जुनी/मोर क्र.१ येथे घेण्यात आली.

यात पंचायत समिती अर्जुनी/मोर अंतर्गत जिल्हा परिषद व खाजगी व्यवस्थापन शाळांनी सहभाग घेतला. सुमारे २५० विद्यार्थी या सराव परीक्षेत सहभागी झाले होते. सराव परीक्षेच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक विनोद मेश्राम होते. तर प्रमुख अतिथी एन.एस.लंजे, विजय गावराने,योगेश कापगते, तेजस्वी कापगते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत मुख्य परीक्षेकरिता शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप लोदी यांनी केले. सूत्रसंचालन श्रीकृष्ण कहालकर तर आभार नरेंद्र बनकर यांनी मानले.

यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना भेटवस्तू व खाऊचे वाटप करण्यात आले. नवोदय सराव मालिकेच्या आयोजनाबद्दल पं. स. अर्जुनी/मोरचे गटशिक्षणाधिकारी अनिल चव्हाण, शिक्षण विस्तार अधिकारी एन.एस.लंजे,बी.डब्ल्यु. भानारकर यांनी शिक्षक समिती शाखा अर्जुनी मोर व सर्व समिती शिलेदारांचे अभिनंदन केले.

सदर नवोदय परीक्षा सराव मालिकेच्या आयोजनाकरीता शिक्षक समितीचे विभागीय अध्यक्ष किशोर डोंगरवार, जिल्हाध्यक्ष संदीप तिडके, सरचिटणीस संदीप मेश्राम, दिलीप लोदी , विनोद बडोले, श्रीकृष्ण कहालकर, गोपाल गायकवाड, पी ए कापगते, यांच्या मार्गदर्शनात म. रा. प्राथ. शिक्षक समितीचे तालुका अध्यक्ष श्री आशिष कापगते, सरचिटणीस रेवानंद उईके, प्रसिद्धी प्रमुख नरेंद्र बनकर उपाध्यक्ष देवेंद्र देशकर, ओमप्रकाश मस्के, सुभाष मानकर, चंद्रकांत डोंगरवार, विनोद गहाने, केशव कोल्हे, देवेंद्र नाकाडे, नरेंद्र शहारे, सुनील बडोले, नेतराम मलगाम, मंगेश पर्वते, विलास पाऊलझगडे, यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आली.

प्रश्नपत्रिका व सराव संच निर्मिती करिता श्री एम पी म्याकलवार, श्री अरुण टेंभुरकर , नरेंद्र बनकर, नरेंद्र अमृतकर, विनोद गहाने, संजय मस्के, युवराज नागपुरे, उमेश तूमरामे यांचे विशेष सहकार्य लाभले

सराव मालिका यशस्वी आयोजनासाठी आर के कापगते, विनोद चीचमलकर, सू मो भैसारे, महेंद्र कोहाडकर, जितेंद्र ठवकर, राजेश तिरगम, राजेंद्र राखडे, आर एस संग्रामे, एच के मानापुरे, गोपाल मंडल, माणिक नंदनवार , भागवत गहाने, नरेश प्रधान, पी टी गहाने, प्रमोद कापगते, प्रमोद चाचेरे, किशोर लंजे, नरेश लंजे, राजेश मरघडे, सपना श्यामकुवर संगीता नवखरे, किरण लाडे, सुप्रिया कांबळे, वनिता झोळे, नरेश परशुरामकर, मोरू राऊत, शिशुपाल अमले, गोविंद बगडे, सचिन गायधने, विलास मुंगमोडे, प्रकाश सांगोळे, प्रशांत गजभिये, खेमराज मंगर व समिती शिलेदार यांचे सहकार्य लाभले.

# विधवा, वंचित व उपेक्षीत महिलांना वाणाचे वाटप

**नागपूर :-** नवउन्मेषण साहित्य सभा व महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती, दक्षिण नागपूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.१९ जानेवारी रोजी समाजातील विधवा, वंचित व उपेक्षीत महिलांना सर्वसामान्य महिलांसमवेत संक्रांती निमित्त समसन्मानाने वाणाचे वाटप करून सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम दत्तात्रय नगर येथील सुधाताई बामनपल्लीवार यांच्या घरी मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून म.अंनिसचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार व रजनी ग. सुरकार खास वर्धा येथून आले होते. यावेळी सामाजिक व परिवर्तनवादी चळवळीत सक्रिय कार्यकर्ते विजय बाभूळकर सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्त्री उद्धारासाठी झटणारे सत्यशोधक म.जोतिबा फुले, सावित्रीमाई फुले व प्रबोधनकारी सत्यशोधक व अंधश्रध्दा निर्मूलनाचे चालते बोलते प्रचारक संत गाडगेबाबा यांच्या फोटोला सर्वांनी पुष्प अर्पण केले.

प्रास्ताविक नवउन्मेषण साहित्य सभेच्या अध्यक्षा सुधाताई बामनपल्लीवार यांनी केले. विधवा स्त्रियांना माणूस म्हणून वागणूक मिळावी म्हणून केशवपन बंद करण्यासाठी न्हाव्यांचा संप, पीडितांसाठी सुतिकागृह, बालहत्या प्रतिबंधक गृह, विधवा पुनर्विवाह इ.फुले दांपत्याचे ऐतिहासिक कार्य आणि मकरसंक्रांतीच्या कार्यक्रमात विधवांना इतर स्त्रियांप्रमाणे सन्मान मिळावा अशा प्रकारे कार्यक्रमाची भुमिका म.अंनिस, दक्षिण नागपूर शाखेच्या कार्याध्यक्ष आशू सक्सेना यांनी भुमिका मांडून विधवा, वंचित व उपेक्षीत महिलांच्या समसन्मानाची संक्लपना स्पष्ट केली. यानंतर प्रा. हुलके यांनी सर्व उपस्थित महिलांना वाणाची भेटवस्तू देऊन व हळद कुंकू लावून आनंदाने सन्मानित केले.

यानंतर उपस्थित प्रत्येक महिलांनी चिठ्ठीव्दारे काढलेल्या विषयावर मांडणी करून आपल्या भावना व्यक्त करीत मनमोकळे केले. कार्यक्रमाचा शेवट गजेंद्र सुरकार, विजय बाभूळकर व बाबा बीडकर यांच्या संबोधनाने झाला. आभार अनुज हुलके यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी म.अंनिस चे नागपूर जिल्हा प्रधान सचिव विनोद उलीपवार, दत्तात्रय नगर शाखेचे कार्याध्यक्ष दिवाकर शिर्के, लता ढोक व विश्वास पिड्डूलवार यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात आठ विधवा महिला, पाच वंचित व उपेक्षीत महिलांसह सर्वसामान्य महिला या मोठ्या उत्साहाने सहभागी झाल्या होत्या व त्यांचा आनंद ओसंडून वाहत होता. कार्यक्रमात सुशीला साकोरे,सरला मुप्पीडवार, सुनिता गड्ढमवार, आशा शिर्के, विणा उलीपवार, कु. मानसी उलीपवार, रंजना बीडकर, शीतल जाधव,उमा पाल, रूपा शाहू, सुमन चिचमलकर, लक्ष्मी लांजेवार, अल्का वांढरे, रंजना कोल्हे व लक्ष्मी चौबे तसेच अशोक पाटील हे सहभागी झाले होते. यावेळी उपस्थितांना म.अंनिसची सन २०२५ ची दिनदर्शिका भेट म्हणून देण्यात आली.



# ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेद्वारे मुलींसाठी घरगुती उपकरण दुरूस्तीचे मोफत प्रशिक्षण

**गोंदिया :-** सुशिक्षित बेरोजगारांची दिवसेंदिवस वाढत असलेली संख्या कमी करण्याच्या दृष्टीकोणातून ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, महाराष्ट्र राज्य ग्रामीन्नोती अभियान (उमेद), नाबार्ड व माविम यांनी देशातील प्रत्येक जिल्ह्यात ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (आरसेटी) सुरू केल्या आहेत. जिल्ह्यागत ज्या प्रमुख बँका आहेत त्यांच्याकडे अशा आरसेटी चालवण्याची जबाबदारी सोपवण्यात येते. बँक ऑफ इंडिया ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था कुडवा गोंदिया द्वारे जिल्ह्यातील बेरोजगार युवक व युवतींना स्वयंरोजगार करण्यासाठी प्रोत्साहित करण्याकरिता विविध प्रकारचे स्वयंरोजगार प्रशिक्षण आयोजित केले जात असून ही संस्था २१ जानेवारी २०११ पासून कार्यरत आहे. तसेच ही संस्था भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारे संचालित केले जाते. स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेने आजपर्यंत ९०७४ ग्रामीण व्यक्तिंना प्रशिक्षण दिले असून त्यापैकी ६९१६ व्यक्तिंनी मिळविलेल्या प्रशिक्षणाच्या आधारे स्वयंरोजगार सुरू केला आहे. बँक ऑफ इंडिया (आरसेटी) स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेद्वारे बेरोजगार असलेल्या १८ ते ४५ वयोगटातील मुलींकरिता ङ्घरेलू विद्युत उपकरण दुरुस्तीङ्क या व्यवसायाचे ३० दिवसीय मोफत प्रशिक्षण सुरू होणार आहे. परंतु त्याकरिता आरसेटीला कोर्स सुरू करण्याकरिता कमीत कमी ३० ते ३५ उमेदवारांची गरज असते. तसेच या संस्थेमध्ये विविध प्रकारचे कोर्स निःशुल्क असून राहण्याची, जेवणाची निःशुल्क सोय प्रशिक्षण संस्थेतच करण्यात येत आहे. तरी गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील इच्छुक युवक-युवतींनी जास्तीत जास्त संख्येने व लवकरात लवकर संस्थेत येऊन आपले नाव नोंद करावेत.

ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांनी या संधीची लाभ घ्यावा व तांत्रिक प्रशिक्षण घेऊन स्वयंरोजगार करावा. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील बेरोजगारांना प्राधान्य देण्यात येईल. इच्छुक उमेदवारांनी आपले आवेदन पत्र निदेशक, स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान, वाहने पॅलेस, हरिणखेडे पेट्रोलपंप जवळ, तिरोडा रोड, कुडवा (गोंदिया) येथे त्वरित जमा करावे. अधिक माहितीसाठी ९८३४८९५०७७ अथवा ८६९८१४०१०५ यावर संपर्क साधावा, असे संस्थेचे निदेशक अब्दुल वसीम अब्दुल गणी यांनी कळविले आहे.

# आरक्षणाचे शत्रू,देशाचे दुश्मन!

आरक्षणाला विरोध नाही असे म्हणत 'सेव्ह मेरिट सेव्ह नेशन' असा फसवा फंडा उभा करत आरक्षणाचे राजकारण बंद करा. मराठा आरक्षण आणि आर्थिक आरक्षण यामुळे आरक्षणाची मर्यादा ५० % पेक्षा अधिक झाली, असून मेरीट विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे अशा सबबी समोर करत काही उच्चजात संघटना आंदोलन चालू करत आल्या आहेत. त्यात प्रामुख्याने नेहमी आरक्षणाला विरोध करणाऱ्या आणि उच्चजातीय संघटनांचे नाव प्रामुख्याने दिसत असल्याने केवळ यांच्याच जातीत गुणवत्ता आहे काय? मेरीटच्या नावाखाली अप्रत्यक्ष आरक्षणाला विरोध करून विशेषतः ओबीसींना संभ्रमित करण्याचा कुटिल डाव आरक्षण विरोधकांनी वारंवार रचून आपले जातवर्चस्ववादी हितसंबंध जपलेले आहे. आजच्या परिस्थितीतही मेरीटचे तुणतुणे वाजवीत? आरक्षण विरोधात गळा काढून 'सेव्ह मेरिट सेव्ह नेशन' असा भुलभुलय्या उभा केला जात आहे. दुसऱ्या बाजूने आरक्षणाचा बचाव करण्यासाठी विविध ओबीसी- दलित- आदिवासी संघटना एकवटून आरक्षण विरोधकांचे मनसुबे ओळखून आरक्षण हा आमचा घटनादत्त अधिकार आहे हे ठासून सांगत आहेत. भारताच्या सत्तर वर्षांच्या स्वातंत्र्योत्तर काळात घटनादत्त अधिकारामुळे आरक्षण मिळाले असून ५००० वर्षे उच्चवर्णीय जुलमी विषम सत्तेखाली पिचलेला ८५ % समाज अजूनही आरक्षणाच्या अपेक्षित साध्यापर्यंत पोहचला नाही. उलट उच्चवर्णीयांचे वर्चस्व सर्वठायी दिसत आहेत. न्यायालयात न्यायाधीशांची संख्या, राज्यपाल, सचिवालयातील सचिव, क्लासवन अधिकारी, कलावंत, साहित्यिक, लेखक, शिक्षणक्षेत्रातील नामवंत, प्रसारमाध्यमे या सर्वांमध्ये मोठ्या प्रमाणात उच्चवर्णीय असून एस.सी., एस.टी., ओ.बी.सी.च्या लोकसंख्येच्या प्रमाणात तर सोडा फार अल्पप्रमाणात या ८५ % समाजघटकांना पोहचता आले नाही. त्यांचा पारंपरिक शेती- शेतीनिगडित अलुतेदारी- बलुतेदारीतील व्यवसाय आणि सीमित अर्थार्जनाची साधने. ज्ञानार्जनाची अल्पकाळ मिळालेली संधी यामुळे हा समाज आजही खूप मागे आहे. शिक्षण, नोकरी, उद्योग, या सर्व मोक्याच्या जागी पोहचण्यासाठी घटनेने आरक्षणाचा अधिकार बहाल केलेला आहे .

जातीय विषमतेमुळे शिक्षण- नोकरी-उद्योगात हजारो वर्षे संधीपासून वंचित ठेवलेल्या या शूद्रातिशूद्र वर्गाला जोपर्यंत जातीयता नष्ट होत नाही, अर्थात समान पातळीवर येत नाही तोपर्यंत आरक्षणाची निकड प्रतिपादन केलेली आहे .

वास्तविक पाहता जातिव्यवस्थेतून शोषित- दलित समाजाच्या विकासासाठी नाकारलेल्या संधीमुळे आरक्षणाची गरज निर्माण झाली. धर्मशास्त्राचे नियम, चातुर्वर्ण्यव्यवस्था जातबंदिस्तपणा यामुळे शूद्रातिशूद्र समाज गतिहीन झाला. जातीत बंदिस्त झाला. पारंपरिक जातीय व्यवसाय सक्तीमुळे विद्यार्जन, व्यवसाय निवड, शासकीय सेवेत मागे पडल्याने, लोकशाही शासनप्रणालीत निर्णयनिर्मितीप्रक्रियेत पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे म्हणून आरक्षणाची तरतूद निर्माण झाली. महात्मा फुल्यांनी सर्व जातींना लोकसंख्येच्या प्रमाणात सर्व क्षेत्रात समान तत्त्वावर वाटा मिळायला पाहिजे तत्कालीन ब्रिटिश सत्तेला ठणकावून सांगितले. शासनप्रशासनात उच्चवर्णीयांचे वर्चस्व असल्याने शूद्रातिशूद्रांचे मोठ्या प्रमाणात शोषण होत आहे. उच्चप्रदस्त उच्चवर्णीय अधिकारी शूद्रातिशूद्रांच्या विकासाच्या- जातिद्वेषातून-वाटा अडवून ठेवतात. त्यामुळे जातीच्या प्रमाणात आरक्षणाची मागणी पुढे रेटली गेली. उच्चजातींच्या मनात मागासवर्गीयांबद्दल विषमतापूर्ण भाव वागणूक यामुळे अमानवी, अन्याय्य व्यवहार जन्मास येतात म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांना शिकवण्यासाठी शेतकऱ्यांच्या जातीचे शिक्षक नेमणे फुलेंना न्याय्य वाटत. हाच धागा पकडून शाहू महाराज हे करवीर संस्थानामध्ये बहुजन समाजाला शंभर वर्षांपूर्वी ५० % आरक्षण देऊन आरक्षणाची न्यायिक अपरिहार्यता अधोरेखित करतात.

'स्वातंत्र्योत्तर काळातही जातीय विषमता आमि उच्चजातीयांच्या सर्वक्षेत्रात असलेल्या वर्चस्वामुळे आणि बहुजनसमाजाचे अत्यल्प प्रतिनिधित्व यामुळे संविधानात आरक्षणाची तरतूद करणारे ३४० व ३४१, ३४२ या कलमांन्वये बहुजन समाजाला संवैधानिक अधिकाराच्या माध्यमाने आरक्षण दिले जाते.' आणि त्याद्वारे समानता, न्याय, बंधुता इ . प्रस्थापित होण्याचा उद्देश प्रतिपादन होतो. समतावादी समाजनिर्मितीसाठी आरक्षणाची आवश्यकता असल्याचे त्यातून ध्वनित होते. मात्र स्वातंत्र्यानंतरही ओबीसी दलित आदिवासी समाजाला स्वकीय राजवटीत न्याय्य वाटा मिळाला का? मंत्रिमंडळ, न्यायपालिका, राज्यपाल, नोकरशाही, न्यायाधीश, डॉक्टर, प्राध्यापक, शिक्षणतज्ज्ञ, वैज्ञानिक, वृत्तपत्रसंपादक, प्रसारमाध्यमातील प्रमुख इ . मोक्याच्या जागा उच्चवर्णीयांनी अर्थात, मेरीटचा डंका पिटणाऱ्यांनी काबीज करून ठेवल्या तरी आज यांपैकी अनेक क्षेत्रांची पिछेहाट झाली, म्हणून सरकार अनेक क्षेत्रांचे खाजगीकरणाचाही अंगीकार करण्यास सरसावले आहे असे वरुन बोलले जाते. हे मेरीटवाल्यांची नाचक्की नव्हे काय? विद्यापीठांतील ज्ञानशाखांमधील सुमार संशोधने, कृषिक्षेत्रातील अधिकाऱ्यांची शेतकऱ्यांप्रति अनास्था, दुजाभाव, बांधकामातील भ्रष्टाचारामुळे पूल, इमारती, रस्ते धरणे आदींचा दर्जा, न्यायिक क्षेत्रातील लालफितशाहीमुळे प्रलंबित प्रकरणे, नोकरशाहीतील कुप्रशासनामुळे भ्रष्टाचार, स्वार्थी जातवर्चस्ववादी वृत्तीतून जन्मलेली दलाल प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक्स मीडिया, वृत्तवाहिन्या हे यांपैकी काही मासलेदार नमुने आहेत, मेरीटवाल्यांचे वाभाडे काढण्यासाठी ! उलट ज्यांना मेरीटच्या कक्षातून यांनी बाहेर ढकलले असे श्रमिक एका दाण्याचे शंभर दाणे करण्याची किमया करत आहेत. नवनिर्मितीक्षम कष्टकरी श्रमिक समाजाला लक्ष्य करून आरक्षणामुळे मिळणाऱ्या सहभागाच्या संधीपासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र हे सोकॉल्ड मेरीटधारी करीत आहेत. शंभर वर्षांपूर्वी दिनकरराव जवळकर ज्यांना देशाचे दुश्मन म्हणायचे ते हेच. त्यांचे कपटी डाव हाणून पाडले पाहिजेत, हीच आज खरी लढाई असेल. बहुजनांच्या पुढील पिढ्यांच्या भल्यासाठी !

**अनुज हुलके**

# क्रीडा शिक्षकाचे विद्यार्थिनीशी अश्लिल चाळे शहिद मिश्रा विद्यालयातील प्रकार




## पालकांनी दिला त्या शिक्षकाला प्रसाद

**प्रकाराचे बिंग फुटले हे लक्षात येताच आरोपी शिक्षक सुनिल शेंडे यांनी १९ जानेवारी रोजी पीडित विद्यार्थिनीच्या घरी जावून पालकांची भेट घेतली. दरम्यान जे झाले ते झाले पुढे असे होणार नाही, अशी माफी मागत पुढील कारवाई न करण्याची निवंती करू लागला. यावरून संतप्त पालकांनी शिक्षक सुनिल शेंडे याला प्रसाद दिला.**

**सदर घटनेची माहिती गटशिक्षणाधिकाऱ्याच्या माध्यमातून घेण्यात आली आहे. सदर शाळा खाजगी असल्यामुळे त्या शिक्षकाला निलंबन करण्यात यावे, असे प्रस्ताव गटशिक्षणाधिकारी यांच्या माध्यमातून संबंधित प्राचार्य व संचालक मंडळाकडे पाठविण्यात आले आहे.**

**- गजभिये, शिक्षणाधिकारी जि.प.**

**तिरोडा:-** स्थानिक शहिद मिश्रा विद्यालयात कार्यरत क्रीडा शिक्षकाने वर्ग दहावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थिनीशी अश्लिल चाळे केले. या प्रकाराची माहिती मिळताच पालकांनी त्या शिक्षकाविरुद्ध चांगलाच असंतोष व्यक्त केला. दरम्यान तिरोडा पोलिस ठाण्यात शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १६ ते १९ जानेवारी दरम्यानची आहे. सुनिल आत्माराम शेंडे (५२) असे आरोपीचे क्रीडा शिक्षकाचे नाव आहे. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. शिक्षकच शिक्षण क्षेत्राला काळीमा फासत असतील तर विद्यार्थिनीच्या सुरक्षेचे प्रश्न संपुष्टात येणार, असा सवालही पालकांकडून उपस्थित केला जात आहे. तिरोडा येथील शहिद मिश्रा विद्यालयात वर्ग १० वीमध्ये पीडित विद्यार्थिनी शिक्षण घेत आहे. पीडित विद्यार्थिनीला एनसीसी सराव करण्यासाठी १६ जानेवारी रोजी सकाळी शालेय परिसरात आली असतांना, क्रीडा शिक्षक सुनिल शेंडे यांनी तिची खेळ काढली. तसेच सायंकाळी देखील पुन्हा तिच्याशी अश्लिल चाळे केले. एवढेच नव्हेतर या घटनेची माहिती इतरास देवू नये, अशी धमकी सुद्धा दिली. त्यातच १९ जानेवारी रोजी पुन्हा त्या विद्यार्थिनीला क्रीडा कक्षात बोलावून तिच्याशी अश्लिल चाळे केले. दरम्यान सदर विद्यार्थिनीने या प्रकाराची माहिती पालकांना दिली. यामुळे क्रीडा शिक्षक सुनिल शेंडेच्या करामतीचे बिंग फुटले.

दरम्यान या घटनेची चर्चा सुरू झाली. यावर सुनिल शेंडे याने पीडित मुलीच्या घरी माफी मागण्याचा प्रयत्न केला. मात्र पीडित मुलीच्या पालकांनी त्याला हाकलून लावले. तिरोडा पोलिसात आरोपी शिक्षक सुनिल शेंडे विरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीनुरूप आरोपी विरुद्ध कलम ७४, ७५(१) (१), भारतीय न्यायसंहिता व सहकलम ८, १२ लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## पोलिस ठाण्यात पालकांचा जमाव

**शहिद मिश्रा विद्यालयात कार्यरत शिक्षक सुनिल शेंडे यांनी विद्यार्थिनीशी अश्लिल चाळे केले. या प्रकरणाला घेवून शेकडो पालकांनी पोलिस ठाणे गाठून शिक्षकाविरुद्ध चांगलाच संताप व्यक्त केला. सदर शिक्षकाला अटक करण्यात आली, अशी मागणी लावून धरण्यात आली. मात्र शिक्षक हा जखमी असल्यामुळे गोंदिया येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहे. वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने अटक करण्यात येईल, असे आश्वासन पोलिस विभागाकडून देण्यात आले.**

या प्रकरणामुळे तिरोडा तालुक्यासह जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. पुढील तपास पोनि. अमित वानखेडे यांच्या मार्गदर्शनात उपपोनि. दिव्या बरळ करीत आहेत.

# १०८ रुग्णवाहिका ठरली जीवनदायिनी

**१ मार्च २०१४ पासून सेवेत : १०८ रुग्णवाहिकांची दशकपूर्त अविरत सेवा,१.९० लाख रुग्णांनी घेतला लाभ**

**गोंदिया :-** आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय सेवा जलद मिळावी, यासाठी जिल्ह्यात आरोग्य विभागाने दि. १ मार्च २०१४ पासून सुरू केलेल्या म१०८फ या आपत्कालीन रुग्णवाहिका सेवेचा तब्बल एक लाख ९० हजार ९६९ रुग्णांनी लाभ घेतला आहे. एकंदर या एक लाख ९० हजार ९६९ रुग्णांसाठी १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका जीवनदायिनी ठरली असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व आरोग्य विभाग यांच्या सहकार्याने १ मार्च २०१४ पासून जिल्ह्यात म१०८फ आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा सुरू झाली आहे. अगदी मोफत पद्धतीने दिल्या जाणा?या सेवेमुळे अपघातग्रस्त, बाळंतपणासाठी अडलेल्या महिला, विषबाधेसह इतर सर्वच प्रकारची वैद्यकीय मदत नागरिकांना वेळेत पोहोचू शकल्याने अनेकांना नवजीवन देण्याचे काम त्यामुळे साध्य झाले आहे. १०८ क्रमांकावर कॉल केल्यास अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सज्ज असलेली रुग्णवाहिका रुग्णांच्या सेवेसाठी सुवर्णकाळात हजर होत आहे. रुग्णवाहिकेतील यंत्रांच्या साहाय्याने गोल्डन अवर्समध्ये रुग्णांना हॉस्पिटलमध्ये भरती करण्यापूर्वी आवश्यक उपचार मिळतात. त्यामुळे घटनास्थळापासून हॉस्पिटलपर्यंत पेशंटना स्वस्थता लाभत आहे.




## १०८ चे काम असे चालते

**रुग्ण अथवा इतर कोणांकडून १०८ क्रमांकावर कॉल केल्यास तो क्रमांक कुठला ते शोधले जाते. त्याचवेळी मजीपीएसफच्या मदतीने त्या भागात कोणते रुग्णालय आहे हे पाहून तेथील ग्रामीण, उपजिल्हा रुग्णालय अथवा प्राथमिक आरोग्य केंद्राला माहिती दिली जाते. त्यानंतर रुग्णवाहिका रुग्णापर्यंत कमीत कमी वेळेत पोहोचेल, याकडे लक्ष दिले जाते.**

## येथे आहेत १०८ रुग्णवाहिका

**या योजनेंतर्गत जिल्ह्यात १५ अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सज्ज रुग्णवाहिका कार्यरत आहेत. या रुग्णवाहिका सध्या के.टी.एस. सामान्य जिल्हा रुग्णालय, बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय तिरोडा, ग्रामीण रुग्णालय देवरी, ग्रामीण रुग्णालय आमगाव, ग्रामीण रुग्णालय सडक अर्जुनी, ग्रामीण रुग्णालय अर्जुनी मोरगाव, ग्रामीण रुग्णालय नवेगाव बांध, ग्रामीण रुग्णालय गोरेगाव, ग्रामीण रुग्णालय सौंदड, ग्रामीण रुग्णालय चिचगड, ग्रामीण रुग्णालय सालेकसा, ग्रामीण रुग्णालय रजेगाव, प्राथमिक आरोग्य केंद्र एकोडी, प्राथमिक आरोग्य केंद्र डव्वा येथे कार्यरत आहेत.**

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व आरोग्य विभाग यांच्या सहकार्याने जिल्ह्यात १५ रुग्णवाहिका कार्यरत असून, सकाळ आणि रात्र सत्रांत वाहनचालक व वैद्यकीय अधिकारी त्यासाठी आरोग्य सेवा देत आहे. या सेवेचा दळणवळणासाठी जिकिरीच्या ठरणाऱ्या व अतिदुर्गम भागांमधील नागरिकांसह तालुका आणि शहरी भागातील नागरिकांसाठी ही सेवा मोफ्फत असते. वैद्यकीय तातडीच्या वेळी १०८ क्रमांक डायल करून रुग्णवाहिकेची मदत घेता येते. प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालय अशा वेगवेगळ्या ठिकाणी या रुग्णवाहिका उपलब्ध असतात.

## निर्यात क्षेत्रास प्रोत्साहन देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन

**गोंदिया :-** केंद्र शासनाच्या “”जिल्हा हेच निर्यात हबफ्फ या संकल्पनेवर भर देऊन एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम व जिल्ह्यातून एकूण निर्यात वृध्दीस चालना देण्यासाठी राज्य तसेच केंद्र शासनाचे विविध विभाग त्यांचे उपक्रम व योजना उद्योग संचालनालयामार्फत राज्यात राबवित आहेत. अशा सर्व योजनांची माहिती उद्योजकांना एकाच व्यासपीठावर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संबंधित सर्व विभागांच्या सहकार्याने Maharashtra Exort Convention २०२४-२५ या अंतर्गत निर्यात क्षेत्रास प्रोत्साहन देण्यासाठी २२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यशाळेमध्ये निर्यातीकरीता DGF$T> ZmJnya, India Post, निर्यात कर्ज देणाऱ्या बँका तसेच यशस्वी निर्यातदार यांचे मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील उद्योजक, नवउद्योजक, निर्यातक्षम उद्योग, बँक प्रतिनिधी, औद्योगिक विकासाशी संबंधित विविध विभागांचे प्रमुख यांनी सदर कार्यशाळेस उपस्थित राहून मार्गदर्शन सत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापकांनी केले आहे.

# आ. विनोद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली नीलम हलमारे यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश



**गोंदिया:-** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या छावा संग्राम परिषदेतून राजकारणाला सुरुवात करणाऱ्या आणि नाना पटोले यांनाच आपले सर्वस्व मानणाऱ्या गोंदियाच्या युवा नेत्या व काँग्रेसच्या जिल्हा सरचिटणीस नीलम हलमारे यांनी काँग्रेस आणि नाना पटोले यांना राम राम करून भाजपमध्ये प्रवेश केला.

काँग्रेसच्या युवा नेत्या नीलम हलमारे यांनी भाजपचे दमदार नेते आणि आमदार विनोद अग्रवाल यांच्या नेतृत्वावर पक्षात प्रवेश केला. नीलम हलमारे यांच्यासह नाना पटोले यांच्या संपूर्ण टीमने सुमारे २५०-३०० तरुणांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

नीलम हलमारे यांच्या भाजप प्रवेशानंतर आमदार विनोद अग्रवाल यांनी पक्षाचा दुपट्टा नेसून आणि फ्फुलांचा गुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. तसेच सर्व कार्यकर्त्यांचेही स्वागत करण्यात आले. आमदार विनोद अग्रवाल म्हणाले, आज नीलम हलमारे यांच्या बाजूने येण्याने पक्ष मजबूत होईल. या सर्व कार्यकर्त्यांना पुढे नेण्यासाठी मी सदैव त्यांच्या पाठीशी उभा राहीन. नीलम हलमारे म्हणाले, नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली पक्ष मजबूत करण्यासाठी मी वर्षानुवर्षे काम केले. मात्र पक्षश्रेष्ठींनी आणि पक्षाने नेहमीच आमच्या विश्वासाचा विश्वासघात केला. आमदार विनोद अग्रवाल यांनी मला नेहमीच लहान भावाप्रमाणे साथ दिली व आपुलकी व प्रेम दिले. म्हणूनच त्यांच्या नेतृत्वावर मी आज भाजपमध्ये प्रवेश केला. माझ्याकडून मला जो काही आदेश मिळेल, तो मी समर्पणाने आणि निष्ठेने पूर्ण करेन.

पक्षप्रवेशादरम्यान फुलचूरचे सरपंच मिलन रामटेककर, राजेश चतुर, दिनकर हलमारे, अशोक चन्ने, विक्की गोहरे, विजेंद्र बरोंडे, अनिल रहांगडाले, संजय मते, इर्शाद भाई, मुकेश लिल्हारे, देवेंद्र डोये, खुशाल नेवारे, सोनवणे महाराज यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व महिला उपस्थित होत्या.

## जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रित

**गोंदिया :-** महाराष्ट्र शासनाचे क्रीडा धोरण २००१ अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत जिल्ह्यातील उत्कृष्ट क्रीडापटू व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे/योगदानाचे मुल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने गुणवंत क्रीडा मार्गदर्शक व गुणवंत खेळाडू (पुरूष व महिला) दिव्यांग गुणवंत खेळाडू यांना यावर्षी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी जिल्हा क्रीडा पुरस्काराचे वितरण करण्यात येत आहे. या पुरस्काराचे स्वरूप प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि रोख रक्कम १० हजार रुपये असे आहे. त्या अनुषंगाने सन २०२०-२१ च्या पुरस्काराची जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पुरस्काराचे निकष :** पुरस्कारासाठी अर्ज करणा?या अर्जदाराचे महाराष्ट्रात सलग १५ वर्षे वास्तव्य असले पाहिजे. क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्षे महाराष्ट्रात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केले असले पाहिजे व त्याने वयाची ३५ वर्षे पुर्ण केलेली असणे आवश्यक आहे. गुणांकनाकरीता त्या जिल्ह्यातील खेळाडूंचीच कामगिरी ग्राह्य धरली जाईल. दिव्यांग खेळाडू व गुणवंत खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपुर्व पाच वर्षापैकी दोन वर्षे त्या जिल्ह्याचे मान्यताप्राप्त खेळांच्या अधिकृत स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे. एका जिल्ह्यामध्ये जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त करणारी व्यक्ती राज्यातील अन्य जिल्ह्यात क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. एकदा एका खेळामध्ये किंवा एका प्रवर्गामध्ये जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त केलेली व्यक्ती पुन्हा त्याच खेळात किंवा प्रवर्गात जिल्हा क्रीडा पुरस्कार मिळण्यास पात्र असणार नाही.

# ६०५ लोकांनी केला नेत्रदानाचा संकल्प २०२४ मध्ये ३०-जणांनी केले नेत्रदान



**गोंदिया :-** नेत्रदानाचा संकल्प घेवून नेत्रदान करावे, या संदर्भात आरोग्य विभागातर्फे जनजागृती केली जात आहे. या जनजागृतीमुळे सन २०२४ मध्ये ३० जणांनी नेत्रदान केले आहे. तरइतर ६०५ लोकांनी नेत्रदानाचा संकल्प केला आहे. यामुळे अंधकारमय जीवन जगत असलेल्यांना जग पाहण्यासाठी पुण्याचे काम दात्यांनी केले आहे. इतरांनी यापासून प्रेरणा घ्यावी व नेत्रदानाचा संकल्प करावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अमरिश मोहबे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी गोंदियावासियांना केले आहे.

नेत्रदानाला सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. नेत्रदानामुळे एखाद्या नेत्रहिनाच्या अंधकारमय जीवनात प्रकाशाची नविन पहाट होत असते. यामुळे नेत्रदान करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने केले जाते. तुम्ही केलेल्या नेत्रदानामुळे हे जग पाहण्यासाठी एखाद्याला संधी मिळत असते. तुमच्यानंतर नेत्राची गरज असलेली व्यक्ती तुमच्या डोळ्यांनी जग पाहत असतो. यामुळे नेत्रदानाला पुण्याईचे दान मानले गेले आहे. आरोग्य विभागाच्या वतीने या संदर्भात विविध स्तरावर जनजागृती केली जाते.

सन २०२४ मध्ये गोंदिया जिल्ह्यातील ३० जणांनी नेत्रदान केले आहे. तर ६०५ जणांनी के. टी. एस. रुग्णालयातील नेत्र विभागात नेत्रदानाचा संकल्प केला आहे.

अंधारलेल्याचे आयुष्य प्रकाशमय करण्यासाठी नेत्रदानाच्या उपक्रमाला चळवळीचे स्वरूप देणे आवश्यक आहे. एका व्यक्तीच्या नेत्रदानाने दोन अंध व्यक्तींना दृष्टी प्राप्त होते. त्यामुळे नेत्रदानाचा संकल्प प्रत्येकाने करावा व इतरांनाही त्यासाठी प्रवृत्त करण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

**तुम्हीही करू शकता नेत्रदान**

नेत्रदानाची प्रक्रिया मृत्युच्या काही तासांमध्ये करण्यात येते आणि यामुळे कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाही. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीने डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते. त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे प्रकाशमय होते. तुम्हालाही एखाद्या व्यक्तीचे आयुष्य उजळून टाकायचे असेल तर के. टी. एस. रुग्णालयातील नेत्र विभागाकडे संपर्क करून नेत्रदानासाठी नोंदनी करू शकता. नेत्रदानाही इच्छा व्यक्त केलेली व्यक्ती मृत पावली आणि त्यांच्या नातेवाईकांनी कळवले तर हे नेत्रसंकलन रुग्णालयात जावुन करण्यात येते. यासाठी दहा में पांच मिनिटाचा कालावधी लागतो. प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यादीही नेत्रपेढीकडे तयार असते.

# मानवी जीवनात खेळाला अनन्यसाधारण महत्व-जिल्हाधिकारी नायर महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे थाटात उदघाटन




**गोंदियाः- :** महसुल विभाग हा प्रशासनाचा कणा आहे. या विभागात काम करतांना अनेक घडामोडींना सामोरे जावे लागते. कामाच्या वाढत्या ताणतणावामुळे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. खेळाच्या माध्यमातून मानसिक व शारिरीक आरोग्य सुदृढ ठेवण्यास मदत होते. अशाप्रकारच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमुळे अधिकारी व कर्मचारी यांच्यात लपलेले सुप्त गुण या माध्यमातून समोर येतात. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा खेळाडू व कलाकारांसाठी एक व्यासपीठ आहे जिथे आपल्या कलागुणांना चालना मिळते. त्यामुळे मानवी जीवनात खेळाला अनन्यसाधारण महत्व आहे. या क्रीडा स्पर्धेत सहभाग घेवून विजय मिळवावा, त्यासोबतच विभागीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्ह्याचे नाव लौकीक करावे असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले.

दिनांक २१ ते २३ जानेवारी २०२५ दरम्यान आयोजित जिल्हास्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांना आज जिल्हा क्रीडा संकुल गोंदिया येथे प्रारंभ झाला, त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांनी क्रीडाज्योत व दीप प्रज्वलित करुन केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) मानसी पाटील, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) किरण अंबेकर यांचेसह सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. नायर म्हणाले, मानवाने जीवनात सुदृढ, निरोगी व आनंददायी जीवन जगण्यासाठी तसेच शारिरीक व मानसिक आरोग्यासाठी नियमितपणे खेळणे व व्यायाम करणे आवश्यक आहे. दैनंदिन जीवनात प्रत्येकाने खेळासाठी थोडा वेळ दिला पाहिजे. खेळ व व्यायाम यांच्या अभावामुळे कमी वयातच व्यक्ती अनेक रोगांना बळी पडत आहेत, म्हणून खेळकडे वळा. दिवसातील अर्धा, एकतास खेळासाठी द्या असा संदेश देवून ते पुढे म्हणाले, शारिरीक सुदृढतेसोबतच मानसिकदृष्ट्या सुध्दा सुदृढ राहण्यासाठी महसूल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. स्पर्धकांनी खेळाडूवृत्ती जोपासून खेळ खेळावे. खेळाच्या स्पर्धेत आपले कौशल्य दाखवावे. सर्व खेळांचा आनंद घ्यावा व मित्रत्वाचे संबंध टिकवून ठेवावे. स्पर्धकांनी खेळामध्ये वादावाद करु नये. पंचांनी दिलेला निर्णय मान्य करावे असे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम म्हणाले, महसूल क्रीडा स्पर्धेला एक परंपरा आहे. क्रीडा संस्कृती आपल्या जीवनात रुजविण्याची आज आवश्यकता आहे. खेळात सर्व समावेशकता असली पाहिजे. खेळल्याने व व्यायाम केल्याने आपल्या शरिराचे स्नायु बळकट होत असतात. खेळामुळे सर्वांगीण विकास होत असतो. सर्व स्पर्धकांनी खेळाडूवृत्तीने खेळ खेळावे असे त्यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक श्री. भामरे म्हणाले, शरीर हे क्रीडांगण आहे. आपले शरीर सुदृढ, निरोगी व परिपक्व असले पाहिजे. सुदृढ शरिरात सुदृढ मन असले पाहिजे. खेळल्याने मनुष्याचा शारिरीक व मानसिक विकास होत असतो. प्रत्येकाने रोज सकाळी खेळल्याने व व्यायाम केल्याने शरिरातील मस्तिष्क व मन संतुलीत राहते. शरिराची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते. खेळल्यामुळे व व्यायाम केल्याने मुनष्य निरोगी राहतो व शरीर बळकट बनते. स्पर्धकांनी खेळ खेळतांना आपली काळजी घ्यावी असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकातून निवासी उपजिल्हाधिकारी श्री. बेहेरे म्हणाले, दरवर्षी महसूल क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. खेळ हा मानवी जीवनातील एक मुलभूत अंग आहे. महसूल विभागात काम करतांना सर्वांना ताणतणावाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तणावमुक्त राहण्यासाठी प्रत्येकाने व्यस्त कामातून खेळासाठी वेळ दिल्यास आपले आरोग्य निरोगी राहते. त्यासोबतच सांघिक भावनेने खेळ खेळावे, त्यामुळे खेळाडूवृत्ती तयार होवून कामात कितीही त्रास झाल्यास मन विचलीत होत नाही. जीवनात मानवाचे आरोग्य सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी खेळाला अनन्यसाधारण महत्व आहे. सर्व खेळाडूंनी आनंदमय वातावरणात निखळपणे खेळावे व खेळाडूवृत्ती जोपासावी. या महसूल क्रीडा स्पर्धेत एकूण ५५० अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले आहेत असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी मान्यवरांनी एकूण ५ उपविभागाचे पथसंचलनाचे निरीक्षण केले. पथसंचलनात एकूण ५ उपविभागापैकी जिल्हाधिकारी कार्यालय संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. यावेळी तहसिलदार समशेर पठाण यांनी सर्व अधिकारी व कर्मचा?यांना खेळात वचनबध्दता, प्रतिबध्दता व खेळाडूवृत्ती जोपासण्यासाठी क्रीडा विषयक शपथ दिली.



कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती मंजुश्री देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तहसिलदार समशेर पठाण, अपर तहसिलदार श्रीकांत कांबळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, नाझर राकेश डोंगरे, तलाठी रियाद तुर्क यांनी अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी सर्वश्री चंद्रभान खंडाईत (गोंदिया), वरुणकुमार शहारे (अर्जुनी/मोर), पुजा गायकवाड (तिरोडा), कविता गायकवाड (देवरी), जिल्हा पुरवठा अधिकारी सतीश अगडे, तहसिलदार सर्वश्री अनिरुध्द कांबळे (अर्जुनी/मोर), मोनिका कांबळे (आमगाव), महेंद्र गणवीर (देवरी), नरसय्या कोंडागुर्ले (सालेकसा), अक्षय पोयाम (सडक/अर्जुनी), प्रज्ञा भोकरे (गोरेगाव), नारायण ठाकरे (तिरोडा), ज्येष्ठ खेळाडू मुन्नालाल यादव यांचेसह महसूल विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार आमगाव तहसिलदार मोनिका कांबळे यांनी मानले.

# भूसंपादन करताना शेतकऱ्यांना विश्वासात घ्या

**तिरोडा :-** नागपूर ते गोंदिया समृध्दी महामार्ग तयार होणार आहे. यासाठी भुसंपादनाचे काम होणार आहे. परंतु, महामार्गासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात येणार आहे. त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे शेतकऱ्यांनी याला विरोध दर्शविणे सुरू आहे. भुसंपादनासाठी पालडोंगरी येथील शेतकऱ्यांना नोटिस पाठविण्यात आले आहे. परंतु, ज्या मागण्या शेतकऱ्यांनी ठेवल्या आहेत, त्यावर सकारात्मक उत्तर मिळालेले नाही. त्यामुळे भुसंपादन करताना शेतकऱ्यांना विश्वासात घ्यावे, अशी मागणी पालडोंगरी येथील शेतकऱ्यांनी केली आहे.

समृध्दी महामार्ग गोंदिया जिल्ह्यातून जाणार आहे. यासाठी तिरोडा तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित होणार आहेत. ज्या शेतकऱ्यांच्या जमिन संपादित केली जाणार त्यांच्या मागण्याकडे दुर्लक्ष केले जात आहेत. त्यातच १९ जून २०२४ रोजी पालडोंगरी/भुराटोला ग्राम पंचायतीत यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. तर शेतकऱ्यांना नोटिसही पाठविण्यात आले आहे. परंतु, मागण्या मंजूर केल्याशिवाय जमिन संपादित करू नये, तसेच जमिन संपादित करताना शेतकऱ्यांना विश्वासात घ्यावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.


## कल्पीता समुह येगाव ता अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया NRLM अंतर्गत खुली निवीदा

जा.क्र.क.स. येगाव ०५/२०२५.

कल्पीता समुह मुः येगाव, पो.इटखेडा ता. अर्जुनी मोरगाव जि.गोंदिया येथे स्वंय सहायता समुह स्तरावर औजार बैंक निधी अंतर्गत. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान(उमेद) औजार बँक साहित्य नोंदणीकृत कंपनीकडन वेंडर/पुरवठादार/डीलर कडून आमंत्रीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विवरण | किंमत अंदाजे |
|---|---|---|
| १ | ट्रक्टर ऑन रोड इन्सुरंस पासींग | 760000 |
| २ | रोटावेटर (Rotavator) | 150000 |
| ३ | नांगर (Cultivator) | 40000 |
| ४ | कॅज व्हील (Cage wheel) | 30000 |
| ५ | फन (Land Lavelar) | 20000 |
| | एकूण रुपये | 10,00,000 |

बंद निविदा दिनांक-२२/०१/२०२५ च्या सकाळी १० वाजता पासून २६/१/२०२५ च्या सायंकाळी ५ वाजता पर्यंत कल्पीता समूह येगाव पो. इटखेडा ता. अर्जुनी मोरगाव जि.गोंदिया यांचेकडे सादर करावे. दि. २८/०१/२०२५ ला दुपारी १२ वाजता बंद लिफाफा निविदि उघडण्यात येईल. सदर औजार बँक साहित्य खरेदी करण्याचे पूर्ण अधिकार कल्पीता समूह मु.येगाव यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

**अध्यक्ष/सचिव**

कल्पीता समुह मु.येगाव पो.इटखेडा
ता.अर्जुनी/मोरगाव जि.गोंदिया पिन.४४१७०१

# गावठाणातील मालकी हक्काची अभिलेख मिळकत पत्रिका तयार होणार-जिल्हाधिकारी प्रजित नायर

## स्वामित्व योजनेंतर्गत पांजरा येथे सनद वाटप कार्यक्रम,जिल्ह्यातील ४५६ गावात सनद प्राप्त

**गोंदिया :-** मालकी हक्कावरुन होणाऱ्या वाद-विवादावर आता स्वामित्व योजनेअंतर्गत लगाम बसणार असून गावातील गावठाणातील मालकी हक्काची अभिलेख मिळकत पत्रिका तयार होणार आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले.



जिल्ह्यातील गोंदिया तालुक्यातील जि.प.हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा पांजरा येथे आज स्वामित्व योजनेचा शुभारंभ करण्यात आला, त्यानिमित्ताने आयोजित सनद वाटपाच्या कार्यक्रमात ते अध्यक्षस्थावरुन बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) मधुकर वासनिक, उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत, तहसिलदार समशेर पठाण, गटविकास अधिकारी आनंदराव पिंगळे, उपअधीक्षक भूमी अभिलेख अजय क्षीरसागर, विस्तार अधिकारी (पंचायत) चुन्नीलाल गावड, जि.प.सदस्या वैशाली पंधरे, पांजरा ग्रामपंचायत सरपंच भुमेश्वरी नागपुरे व उपसरपंच रमन लिल्हारे मंचावर उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दुपारी १२.३० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे स्वामित्व योजनेचा शुभारंभ करण्यात आला. सदर योजनेअंतर्गत देशातील २३० हून अधिक जिल्ह्यांतील सुमारे ५० हजार गावांमधील मालमत्ताधारकांना स्वामित्व योजनेअंतर्गत ६५ लाखांहून अधिक प्रॉपर्टी कार्डचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र, छत्तीसगड, गुजरात, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, मिझोराम, ओडिशा, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि जम्मू-काश्मीर व लडाख या दोन केंद्रशासीत प्रदेशातील मालमत्ताधारकांना प्रॉपर्टी कार्ड वितरीत करण्यात आले.

जिल्हाधिकारी श्री. नायर म्हणाले, गोंदिया जिल्ह्यातील ७११ गावांमध्ये स्वामित्व योजनेंतर्गत ड्रोन सर्व्हे करण्यात आले आहे. त्यापैकी ४५६ गावांचे सनद प्राप्त झाले आहे. जिल्ह्यातील सनदची संख्या ६१ हजार ४६८ आहे. ७/१२ ला जसा मालकी हक्काचा पुरावा असतो तसा कायदेशीर मालकी हक्काचा अधिकार आता स्वामित्व योजनेअंतर्गत अभिलेख मिळकत पत्रिका व नकाशा तयार होणार आहे. या योजनेमुळे उत्पन्नाचे स्त्रोत वाढेल.

सदर मिळकतीवर कर्ज घेण्याची सुविधा उपलब्ध होत आहे. गावठाणातील जमीन विषयक मालकी हक्काबाबत व हद्दीबाबत होणारे वाद याद्वारे कमी होतील. ग्रामपंचायत कडील मालमत्ता कर निर्धारण पत्रक (नमुना ८ नोंदवही) स्वयंचलनाने तयार होईल. याद्वारे ग्रामपंचायतीची आर्थिक पत उंचावेल. सोईसुविधा व शासनाचे सर्व नियोजन करण्यासाठी मदत होणार आहे. शासनाच्या मालकीच्या मिळकतींचे याद्वारे संरक्षण होणार आहे. स्वामित्व योजनेअंतर्गत आता गावातील रस्ते, घरे, शासनाच्या/ग्राम पंचायतीच्या खुल्या जागा, नाले यांचे क्षेत्र व सीमा निश्चित होतील व मिळकतींचा नकाशा तयार होईल. जमिनीचे मोजमाप कसे करायचे याबाबत यापुर्वी बऱ्याच त्रुटी होत्या, त्या त्रुटींचे आता स्वामित्व योजनेंतर्गत निराकरण करण्यात आले आहे. आता घराच्या मालकी हक्काच्या आधारावर आपण कर्ज घेऊ शकतो असे त्यांनी यावेळी सांगितले.

श्री. मुरुगानंथम म्हणाले, स्वामित्व योजनेअंतर्गत आता अत्याधुनिक ड्रोनच्या सहाय्याने गावठाणातील मिळकतीचे अचूक मोजमाप, नकाशा आणि मालमत्ता पत्रक तयार करणे सोपे व सुलभ झाले आहे. सदर योजनेंतर्गत सीमा निश्चिती आणि मोजमापाची कामे आता अधिक प्रभावीपणे व वेळेत पूर्ण होतील. यामध्ये मालमत्तेची कायदेशीर मालकी आणि सुरक्षिततेची हमी असून कर्ज मिळण्याची सुलभ सुविधा उपलब्ध झालेली आहे. जमिनीशी संबंधीत मतभेदाचे त्वरित निराकरण करण्यात येणार आहे. याद्वारे मालमत्तेचे विभाजन अधिक सुलभ होणार असून आता सदर योजनेंतर्गत गावांच्या आर्थिक प्रगतीला नवी दिशा व चालना मिळणार आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात अमृत कवरे, हरकंताबाई गजबे, भास्कर नागपुरे, जियालाल फरकुंडे, हनसराम लिल्हारे, तेजराम लिल्हारे, रामचंद्र लिल्हारे, देवराम लिल्हारे, जयचंद लिल्हारे, उल्हासराव कांबळे, भैय्यालाल कांबळे, बिसन शेंद्रे, हरकंता गजबे, सरस्वताबाई परसमोडे व अमृता शेंद्रे यांना मान्यवरांच्या हस्ते सनद वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपअधीक्षक भूमी अभिलेख अजय क्षीरसागर यांनी केले. सुत्रसंचालन तहसिलदार समशेर पठाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) मधुकर वासनिक यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत अधिकारी नरेश्वंद्र येळे, मुख्याध्यापक शेखर गेडाम, शिक्षक हेमकृष्ण टेंभूर्णे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास सनद वाटप लाभार्थी व पांजरा ग्रामवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २५ वर्ष लोटूनही कारागृहाची प्रतीक्षा



### भंडारा कारागृहावर भार

**गोंदिया येथे कारागृह नसल्याने येथील कैद्यांना भंडारा कारागृहात पाठविले जाते. तेथील कारागृहाची क्षमता ३५० कैद्यांची आहे. आज या कारागृहात ४०० पेक्षा अधिक कैदी आहे. ही संख्या ५०० च्यावर जाते. विशेष म्हणजे, २०० पेक्षा अधिक कैदी गोंदिया जिल्ह्यातील आहेत.**

**गोंदिया पोलीस मुख्यालय लागूनच जागा ताब्यात घेण्यात आली आहे मोजमापही करून घेतले इस्टिमेट तयार करून हाउसिंग पोलीस हाऊसिंग बोर्डाकडे गेले इमारतीचा स्ट्रक्चर तयार करून एक दोन आठवड्यात वरिष्ठ कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविला जाईल मंजुरी व निधी उपलब्ध झाल्यानंतर जिल्हा कारागृह बांधकामाला सुरुवात होणार आहे.**

**देवराव आडे, भंडारा जिल्हा कारागृहाचे अधीक्षक**

**गोंदिया:-** जिल्हा निर्मितीला २५ वर्षे होऊनही कारागृह नसल्याने येथील आरोपींना भंडारा येथील कारागृहात न्यावे लागते. त्यामुळीं शासनाचा पैसा आणि वेळेचेही अपव्यय होतो. दशकभरापूर्वी जिल्हा कारागृह बांधकामाच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. नंतर मात्र सर्व व्यवहार बासनात गुंडाळून ठेवण्यात आले.

गोंदिया जिल्ह्यात भंडारा जिल्ह्यापेक्षा गुन्ह्याचे प्रमाण अधिक आहे. दर महिन्याला सरासरी दीडशे आरोपींना गोंदियातून भंडारा कारागृहात पाठविले जाते. यासाठी पोलिस बळ व पैसा खर्ची पडतो. आरोपी अधिक किंवा अट्टल गुन्हेगार असल्यास वाहन व स्वतंत्र पोलिस कुमक पाठवावी लागते. त्यातच संधी साधून कैदी पळून जाण्याची भीतीही असते आणि गतकाळात अशा घटना घडल्यादेखील. सर्व परिस्थिती पाहता गोंदियात कारागृहाची निर्मिती आवश्यक आहे.

शासनाने २०११-१२ मध्ये गोंदियात 'वर्ग एक'चे कारागृह तयार करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली होती. त्यानंतर जागा पाहण्याच्या हालचाली झाल्या. तत्कालीन कारागृह अधीक्षक बदलून गेल्याने प्रस्ताव तसाच पडून राहिला. नंतर राज्य शासनाच्या नगररचना विभागाने गोंदियात वर्ग २ च्या कारागृहाला मंजुरी देऊन जागेचा शोध घेण्याबाबत पत्र काढले. त्यानुसार जागेची पाहणी झाली. येथील पोलिस मुख्यालय परिसरात जिल्हा कारागृह निर्मिती करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. बांधकाम अंदाजपत्रक आराखडा तयार झाला. इमारत बांधकामासाठी खर्चाचा अहवाल शासनाने मागविला. यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने आराखडा तयार केला. ५०० कैद्यांची क्षमता असलेले कारागृह निर्माण होणार होते. मात्र, दशकभराचा काळ लोटूनही गोंदियाला कारागृह मिळू शकले नाही.

## चित्ररथाद्वारे शासनाच्या योजनांचा जागर

**गोंदिया:-** अनुसूचित जाती उपयोजना २०२४-२५ अंतर्गत सामाजिक न्याय विभागाद्वारे राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करणा?्या चित्ररथास आज जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ केला.जिल्ह्यातील ८ तालुक्यातील गावांमध्ये चित्ररथाद्वारे अनुसूचित जाती उपायोजनेतर्गत शासनाच्या योजनांची जनजागृती करण्यात येणार आहे.

# शेतकऱ्यांच्या धानाला प्रति हेक्टर २० हजार रुपये बोनसचा आदेश केव्हा?



**गोंदिया :-** राज्यातील महायुती सरकारने नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान धानाला प्रति हेक्टर २० हजार रुपये बोनसची घोषणा केली होती. या घोषणेला आता दीड महिन्याचा कालावधी लोटला असून अद्यापही या संदर्भातील शासन निर्णय न निघाल्याने धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

धान शेतीच्या लागवड खर्चात सातत्याने वाढ होत असल्याने धानाची शेती करणे तोट्याची झाली आहे. त्यामुळे राज्य शासनाकडून धान उत्पादकांना प्रोत्साहान अनुदान म्हणून बोनस जाहीर केला जातो. गेल्या तीन वर्षापासून शासनाने धानाला प्रति क्विंटल ऐवजी हेक्टरी बोनस देण्यास सुरुवात केली आहे. यंदासुद्धा नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या वर्षी प्रमाणेच प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस दिला जाणार असल्याची घोषणा केली.

पण या घोषणेला आता दीड महिन्याचा कालावधी लोटला आहे, पण अद्यापही बोनसचा शासकीय आदेश निघाला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. दीड लाख शेतकरी पात्र हमीभावाने धान विक्री करण्यासाठी १ लाख ५० हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. हेच शेतकरी बोनससाठी पात्र आहेत.

### ऑनलाइन नोंदणी अनिवार्य

**बोनसचा लाभ हा शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांनाच मिळणार असल्याचे शासनाने आधीच स्पष्ट केले. आतापर्यंत जिल्ह्यातील १ लाख ५० हजार ६३ शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. तर ऑनलाइन नोंदणी करण्याची मुदतसुद्धा १५ जानेवारीला संपली आहे. मुदतवाढीचे आदेश अद्याप आलेले नाही. त्यामुळे एवढेच शेतकरी बोनससाठी पात्र ठरण्याची शक्यता आहे.**

### धान खरेदीला ३१ जानेवारीची डेडलाइन

**जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाला धान खरेदी करण्यासाठी शासनाने ३१ जानेवारीपर्यंत डेडलाइन दिली आहे. त्यामुळे आता केवळ १४ दिवसच धान खरेदी केंद्र सुरू राहणार असून शेतकऱ्यांना हमीभावाने धान खरेदी करता येणार आहे.**

### ७६ हजार शेतकऱ्यांनी केली धानाची विक्री

**शासकीय हमीभाव केंद्रावर आतापर्यंत जिल्ह्यातील ७६ हजार शेतकऱ्यांनी २२ लाख ८८ हजार १४ क्विंटल धानाची विक्री केली आहे. तर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी ६५ हजार शेतकरी धानाची विक्री करण्याच्या प्रतीक्षेत आहेत.**

# यात्रेमध्ये अन्नपदार्थ विक्रीकरीता अन्न व औषध प्रशासन विभागाची परवानगी आवश्यक

**गोंदिया :-** सालेकसा तालुक्यातील कचारगड येथे १० ते १४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये यात्रा भरणार आहे. सदर यात्रेमध्ये लाखोच्या संख्येने भाविक येत असतात. यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणावर खाद्यपदार्थ तयार करण्याचे व विक्री करण्याचे स्टॉल्स खाजगी व्यक्ती/संस्था यांच्याकडून लावले जातात. तसेच काही सामाजिक संस्था यांच्याकडून प्रसादाचे वाटप केले जाते. या सर्वांना अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ नियम व नियमन २०११ अंतर्गत परवाना घेवूनच अन्नपदार्थांचे वाटप/विक्री करण्यात यावे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त संजय शिंदे यांनी केले आहे.



प्रशासनातर्फे दिले जाणारे परवाने हे ऑनलाईन पद्धतीने दिले जात असुन ते foscos.fssai.gov.in या संकेतस्थळावरुन दिले जातात. ज्या व्यावसायिकांच्या आस्थापनांची वार्षिक उलाढाल ही १२ लाख रुपयांपेक्षा कमी आहे अशा व्यावसायिकांना/आस्थापनांना नोंदणी देण्यात येते. त्यांचे वार्षिक शुल्क १०० रुपये असुन जास्तीत जास्त ५०० रुपये भरुन ५ वर्षासाठी नोंदणी देण्यात येते. ज्या व्यावसायिकांची/आस्थापनांची वार्षिक उलाढाल ही १२ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे अशा व्यावसायिकांना/आस्थापनांना परवाना देण्यात येते. त्यांचे वार्षिक शुल्क २ हजार रुपये असुन जास्तीत जास्त १० हजार रुपये भरुन पाच वर्षासाठी परवाना देण्यात येतो.

ज्या व्यक्ती/संस्था यांच्याकडे अशी अन्न व औषध प्रशासन यांची परवानगी असणार नाही अशा व्यक्ती व संस्था यांना अन्नपदार्थ विक्री/वाटप करण्यासाठी अटकाव करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर यात्रा कालावधीमध्ये प्रशासनातर्फे खाद्य पदार्थांची व आस्थापनांची तपासणी करण्यासाठी पथकांची नेमणूक केलेली असुन सदर पथकामार्फत सतत व्यावसायिकांवर देखरेख ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व अन्न व्यवसायिकांनी व्यवसायाच्या ठिकाणी स्वच्छता, कामगारांची स्वच्छता ठेवून ग्राहकांना सेवा देण्यात यावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्तांनी केले आहे.

# गोंदियातील रेल्वे ओव्हरब्रिजचे बांधकाम अंतिम मुदत लक्षात घेऊन करावे-बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले

गोंदिया:शहरातील रेलटोली,हड्डीटोली आणि मरारटोली या तीन मार्गांवर रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू झाले आहे. बांधकामाला गती देण्यासाठी आमदार विनोद अग्रवाल यांनी राज्याचे बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्यासोबत सचिवालयात बैठक घेतली.ज्यामध्ये आमदार विनोद अग्रवाल यांनी पुलाच्या बांधकामासाठी १८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली जेणेकरून सर्व पूल लवकर बांधता येतील ही विनंती केली.



शहराच्या मध्यभागी असलेल्या रेल्वे ओव्हर ब्रिजचे बांधकाम सध्या सुरू आहे. अंतिम मुदत लक्षात घेऊन, बांधकाम जलद गतीने करावे जेणेकरून नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू नये आणि सुविधा उपलब्ध व्हाव्यात. नागरिकांनी लवकरच या प्रकल्पाचे नियोजन करावे. ब्रिजच्या बांधकामात कोणतीही अडचण येऊ नये म्हणून बांधकामासाठी उपलब्ध असलेला निधीही तातडीने मंजूर करावा, अशी मागणी आमदार विनोद अग्रवाल यांनी बांधकाम मंत्री भोसले यांच्याकडे केली. आमदार अग्रवाल यांच्या विधानाची दखल घेत बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी संबंधित विभागाला गोंदियातील बांधकामाधीन रेल्वे ओव्हरब्रिजचे बांधकाम अंतिम मुदत लक्षात घेऊन पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

बैठकीदरम्यान आमदार विनोद अग्रवाल यांनी गोंदिया विधानसभा मतदारसंघातील विविध बांधकामांबाबत बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे लक्ष वेधले. ज्यामध्ये गोंदिया शहरात नवीन विश्रामगृह बांधण्याची प्रमुख मागणी मांडली आणि सांगितले की, गोंदिया महामार्गावर आंतरराज्यीय पूल बांधण्याबरोबरच नवीन आणि सुसज्ज पद्धतीने नवीन विश्रामगृह बांधले जावे.कटंगटोला-पानगाव रस्ता, बनथर-मुंडेसर घाट आंतरराज्यीय पूल बांधकाम,काटी कासा रस्त्याचे बांधकाम, कासा बेनी आंतरराज्यीय पूल बांधकाम यासारख्या इतर विषयांवर बैठकीत चर्चा झाली. ज्यावर बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी सकारात्मकता दर्शविली आणि लवकरच सर्वांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.बैठकीला बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, आमदार विनोद अग्रवाल, सचिव साडूंगे, सचिव दशपुते, मुख्य अभियंता नंदनवार, अधीक्षक अभियंता भानुसे, कार्यकारी अभियंता लभाने इत्यादी प्रमुख अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## जिल्हास्तरीय पलाश मिनी सरस प्रदर्शनीचे आयोजन २२ ते २६ जानेवारी दरम्यान

**गोंदिया :-** जिल्हास्तरीय पलाश मिनी सरस प्रदर्शनीचे आयोजन दिनांक २२ ते २६ जानेवारी दरम्यान सुभाष शाळेचे ग्राऊंड, गुरुनानक शाळेजवळ, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मुख्य शाखेसमोरील पटांगण, गोंदिया येथे करण्यात आले आहे. पाचही दिवस पलाश प्रदर्शनाचे, खास विदर्भातील ताजे तवाणे तडकेदार खाद्य पदार्थ, विदर्भातील तर्री पोहा, चना पोहा, पाटोळी, गावरान कोंबळीचे तडकेदार चिकन, मटण, विविध कलाकुसर, गोंडी पेन्टींग, बांबू कला, हातमागच्या वस्तू, पुरण पोळी, कपडे, ग्रामीण कला कुशल, लोणचे, पापड, कुरुड्या, पापड आणि खूप काही आहे या पलाश प्रदर्शनात या पहा व खरेदी करा.

गोंदियातील बचतगटांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तू व खाद्य पदार्थांचे भव्य दालनच आपण सर्वांसाठी खुले करण्यात आले आहे. या प्रदर्शनात लहान मुलांना खेळण्यासाठी बाल मंच आणि भर्गच्च सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी सुध्दा आहे. विविध लोक कला, हास्य प्रदर्शन, संगीत मैफिल अशा एकाहून एक कार्यक्रमाची मालिकाच आहे या जत्रेत आणि सर्वांसाठी गूड न्यूज म्हणजे या प्रदर्शनात मोफत प्रवेश आहे. तरी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या पालाश मिनी सरस प्रदर्शनीत सहपरिवार येऊन या प्रदर्शनाचा आस्वाद घ्यावा, उमेद गोंदिया द्वारे कळविण्यात आले आहे.

# कातुर्ली वॉरीयर्सची संख्या पोहोचली ३९ वर

## भारतीय सैनिकांचे गाव म्हणून ख्याती : थलसेना दिवसानिमित्त विविध कार्यक्रम

**गोंदिया:-** सैनिकांचे गाव म्हणून पंचक्रोशीत नावाजलेल्या आमगाव तालुक्यातील कातुर्ली या गावाने आतापर्यंत भारतीय सैन्याला ३५ सैनिक दिले. त्यात आता पुन्हा चौघांची भर पडल्याने ती संख्या आता ३९ वर पोहोचली. या सैनिकांनी गावाला काही देणं लागते या हेतूने विविध उपक्रम राबविणे सुरू केले. १५ जानेवारी रोजी पार पडलेल्या भारतीय थलसेना दिवसानिमित्त समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात आले.

कातुर्ली या गावातील भारतीय सैन्यात असलेल्या सैनिकांनी एकत्र येत कातुर्ली वॉरीयर्स नावाच्या समितीची स्थापना केली. त्यांनी गावाला आपले काही देणे लागते या हेतूने दोन वर्षांपूर्वी गावात भव्य असे प्रवेशद्वार तयार केले. स्वखर्चातून तयार केलेल्या या प्रवेशद्वाराला कातुर्ली वॉरीयर्स प्रवेशद्वार असे नाव देण्यात आले. गावातील तरूण,मुले पुन्हा सैन्यात जावे, यासाठी सातत्याने त्यांना नि:शुल्क प्रशिक्षण देण्यात येत आहे. तर परीक्षेची संपूर्ण तयारी देखील करवून घेण्यात येते. यापूर्वी सैन्यात ३४ गावाने दिले. चालू वर्षात पुन्हा चौघांची भर पडून आता ती संख्या ३९ इतकी झाली आहे. भारतीय थलसेना दिवसानिमित्त १५ जानेवारी रोजी




### गावात सुरू झाले वाचनालय

**कातुर्ली वॉरियर्सच्या वतीने गावातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करता यावी, यासाठी वाचनालय आणि अभ्यासिका देखील तयार करण्यात आली. ग्राम पंचायतीच्या जुन्या इमारतीची डागडुजी करून त्यात पुस्तकांसह इतर साहित्य देखील पुरविण्यात आले. या वाचनालयाचा शुभारंभ देखील १५ जानेवारी रोजी करण्यात आला.**

कातुर्ली वॉरीयर्स समितीच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. त्याचप्रकारे नव्यानेच सैन्यात दाखल झालेल्यांची नावे प्रवेशद्वारावर कोरण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक एस. टी. भालेकर, के.पी. शहारे, श्री पारधी, स्वाती ठाकूर, संतोष भेलावे, धनराज बावनथडे, देवेंद्र नागपुरे आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी नव्याने सैन्यदलात दाखल झालेल्या सैनिकांचे पालक धनलाल वैरागडे, सूरजलाल भेलावे, चंद्रकांत कोरे, रतनसिंह बरेले या पालकांचा सत्कार समितीच्या वतीने करण्यात आला. समितीचे अध्यक्ष प्रेमलाल पटले, सदस्य मोसमी कटरे, जैपाल चावके, गणेश बिसेन, निळकंठ कुंभलकर, लोकचंद कुंभलकर, दिपेश चावके, सुनिल भेलावे यांनी विशेष सहकार्य केले. संचालन, प्रास्ताविक व आभार गणेश बिसेन यांनी केले.

# जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ चा प्रारुप आराखडयाचे योग्य नियोजन करा-प्रजित नायर

**गोंदिया :-** जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ चा प्रारूप आराखडा सर्व विभागाने सादर केला असून योग्य नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी प्रदीप नायर यांनी संबंधित विभाग प्रमुखांना दिले. जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, येथील सभा कक्षामध्ये जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ चा प्रारुप आराखडा संबंधी आढावा बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

सदर आढावा बैठकीत विविध शासकीय विभागाचे अधिकारी, जिल्हा नियोजन समितीचे जिल्हा नियोजन अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते. संबंधित विभागीय अधिकाऱ्यांनी जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ चा प्रारूप आराखडा-आपल्या योजनेवर निधी मागणीनुसार सविस्तर माहितीसह तसेच पावर पॉइंट प्रेझेंटेशनसह उपस्थित राहून आराखडा सादर केला तसेच जिल्हा नियोजन समितीचे इतिवत्तातील मुददयांचे अनुपालन करून संबंधित कार्यवाही यंत्रणांनी त्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

२०२५-२६ या वार्षिक वर्षाकरीता एकूण २६५ कोटी रुपयांची तरतूद असून अंदाजे १९८ कोटी रुपयांचे निधी प्रस्तावित असल्याची माहिती जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी यावेळी दिली. उर्वरीत शासकीय विभागांनी याबाबत आराखडा तयार करून अहवाल सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी बैठकीत केले.



# आदिवासी बहुल मंगेझरी अंगणवाडीतील बालकांच्या सोबत बालपंगत भोजन



**तिरोडा:-** तालुक्यातील सुकळी बिट अंतर्गत येत असलेल्या आदिवासी बहुल मंगेझरी अंगणवाडी केंद्रात जिल्हा परिषद पदाधिकारी व अधिकार्यांनी अंगणवाडीतील चिमुकल्या बालकांसोबत जेवण घेण्याचा नवोक्रम उत्साहात पार पडला.

अनेक वर्षापासून बंद पडलेला उपक्रमाला पुनश्च सुरुवात करण्यात आले.सदर कार्यक्रम जिल्हा कार्यक्रम अधिकार्यांचे वाढदिवसानिमित्त २७ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला होता. परंतु काही कारणास्तव त्या दिवशी रद्द करण्यात आलेला सदर कार्यक्रम १८ जानेवारीला घेण्यात आला. यावेळी महिला बालकल्याण सभापती सविता पुराम, जिल्हा परिषदेचे महिला व बालविकास उपमुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तीकुमार कटरे, बालविकास प्रकल्प गोंदिया १ च्या श्रीमती शितल लाडके, देवरीचे बालविकास प्रकल्प अधिकारी अनिलकुमार पटले, तिरोड्याचे बालविकास प्रकल्प अधिकारी विनोदकुमार चौधरी, पंचायत समिती सदस्य रिता पटले, श्रीमती टेकाम सरपंच ग्रामपंचायत मंगेझरी, श्री.पटले मुख्याध्यापक जि प शाळा मंगेझरी, श्री मसराम ग्रामविकास अधिकारी मंगेझरी, कनकलता काळे पर्यवेक्षिका बीट सुकळी हे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्तविक पर्यवेक्षिका श्रीमती कनकलता काळे यांनी केले. पाहुण्यांचे शाल व श्रीफळ देऊन बीट तथा प्रकल्प तर्फे सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमात चिमुकल्या बालकांसोबत सर्व पदाधिकारी व उपस्थित पाहुण्यांनी जेवण केले. जिल्हा कार्यक्रम अधिकारी कीर्तीकुमार कटरे यांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने अंगणवाडीतील सर्व बालकांना लेखन उपयोगी साहित्य किट भेट स्वरूपात देत फळांचे वाटप केले. सभापती सविता पुराम यांनी बालकांना एक चांगला आहार देण्याची पद्धत या उपक्रमामुळे झाल्याने त्यांच्या मधला कुपोषितपणा दूर होण्यासाठी एक चांगला उपक्रम ठरू शकतो अशी अपेक्षा व्यक्त केली.

कीर्तीकुमार कटरे यांनी सदर प्रकारचे उपक्रम संपूर्ण जिल्ह्यामध्ये राबविणार असल्याचे सांगितले. मंगेझरी अंगणवाडी ही आदिवासी बहुल असल्यामुळे या उपक्रमाची सुरुवात याच अंगणवाडीपासून करण्यात आल्याचे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी मंगेझरी, कोडेबरा, घोटी, सुकडी, गोविंदटोला येथील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी अथक परिश्रम घेतले.